POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-३२५ ● मुंबई, शनिवार, २७ जून २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

काळ्या तेलात अन्न तळणाऱ्यांची आता खैर नाही

तुकाराम मुंढेंकडून हॉटेल व्यवसायिकांसाठी ऐतिहासिक आदेश जारी



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,

अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी हॉटेल आणि रेस्टॉरंट्ससाठी जारी केलेल्या नव्या आदेशाविषयी माहिती दिली. तसेच या आदेशाचं पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

"मी 23 जूनला एक आदेश पारित केलेला आहे. हे आदेश हॉटेल, रेस्टॉरंट यांच्यासाठी आहेत. हॉटेल, रेस्टॉरंट यांनी पाळावायाच्या काही गोष्टी बंधनकारक आहेत. ग्राहकांच्या आरोग्य संरक्षणासाठी एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे", असं तुकाराम मुंढे म्हणाले.

"आम्ही राबवलेल्या विशेष मोहीम आणि सर्वेक्षणात गंभीर त्रुटी आस्थापनांमध्ये आढळल्या आहेत. जसे की, अस्वच्छ आणि आरोग्यास अपायकारक परिस्थितीत अन्न तयार करणे, वापरलेला खाद्य तेलाचा परत वापर करणे, वैद्यकीय तपासणी नसलेल्या कर्मचाऱ्यांकडून अन्न पडताळणी करणं, तापमान नियंत्रणात त्रुटी असणं, अन्न दजाहीन साहित्यात अन्न पदाथार्चे पॅकेजिंग करणं, ग्राहकांना सुरक्षित पाण्याचे पाणी उपलब्ध न करुण देणे आणि विविध अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणे या गंभीर त्रुटी आम्हाला आढळल्या आहेत. या गोष्टी नियमांचे उल्लंघन करणारे आहे. त्यामुळे आम्ही पुन्हा याबाबत आदेश पारित केले आहेत", असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं.

आदेश कुणाकुणाला लागू होईल ?

"हे आदेश सर्व हॉटेल आणि रेस्टॉरंट्सला लागू होणार आहे. तसेच उपहारगृह, ढाबे, कँटिन, कॅफेटेरिया, बेकरी, मिठाईचे दुकानं, कॅटरिंग युनिट, फूड कॅटरस, जूस बास, विविध प्रकारचे किचनस, साखळी उपहारगृह, ई कॉमर्स आणि इतर ऑनलाइन फूड डिलिव्हरी कंपनी या सर्वांना हा आदेश लागू होईल. जिथे जेवण बनवलं जातं आणि लोकांना खाद्य म्हणून विकलं जातं तिथे हा कायदा लागू होईल", अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

तुकाराम मुंढे यांच्याकडून देण्यात आलेले आदेश पुढीलप्रमाणेः

- लायसन्सशिवाय रेस्टॉरंट आणि हॉटेल चालवता येणार नाही.
- स्वच्छता आणि आरोग्य नियमांचे काटेकोर पालन करणे गरजेचं आहे
- कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी आणि प्रशिक्षण गरजेचं आहे. कारण त्याला काही आजार असेल तर अन्नातून तो आजार पसरु शकतो
- कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगवेगळे ठेवणं गरजेचं आहे.
- गरम आणि थंड अन्नासाठी निर्धारित तापमान राखणे गरजेचं आहे.
- परवानाधारक पुरवठाधारकाकडून कच्चा माल खरेदी करणे
- ग्राहकांसाठी मोफत पिण्यायोग्य सुरक्षित पाणी उपलब्ध करुन देणं बंधनकारक आहे. आमच्याकडे पाणी नाही, बाटलीचं विकत पाणी मिळेल, असं बंधनकारक करता येत नाही. त्यावर आम्ही कारवाई करणार आहोत, असं तुकाराम मुंढे यांनी सांगितलं.
- वापरलेल्या खाद्य तेलाचा परत वापर करता येणार नाही. तेलचा वास यायला लागला, ते काळं दिसायला लागलं तर ते आरोग्यासाठी घातक असतं.
- ऑनलाइन विक्री होणाऱ्या अन्न पदार्थावर प्रत्येक ठिकाणी परवाना क्रमांक लागेल. कॅलरीची माहिती द्यावी लागेल. जेवढे किचन असतील त्या प्रत्येक किचनला वेगवेगळी परवानगी घ्यावी लागेल. मोठ्या कंपन्यांनी दरवर्षी किचनचे ऑडिट करणे आवश्यक आहे.

कल्याण-डोंबिवलीतील
हॉटेलांना 3 दिवसांचा अल्टिमेटम!

...तर कारवाई अटळ, एफडीएचा इशारा

■मुंबई। प्रतिनिधी,

आयुक्त तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वात अन्न व औषध प्रशासन राज्यभरात धडक कारवाई करत असून नुकतंच हॉटेल, रेस्तरां, ढाबे, कॅन्टीन, क्लाऊड किचन चालकांसाठी नियमावली प्रसिद्ध केली आहे. याच पार्श्वभूमीवर एफडीएकडून कल्याण-डोंबिवलीतील हॉटेलांना तीन दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. ग्राहकांच्या आरोग्याचे नियम पाळा अन्यथा कारवाई अटळ असल्याच इशारा यावेळी देण्यात आला आहे. "SAFE FOOD, HEALTHY MAHARASHTRA" अभियानांतर्गत अन्न व औषध प्रशासन विभाग आता ॲक्टिव्ह मोडवर आला आहे. कल्याण-डोंबिवलीतील हॉटेल व्यावसायिकांना ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित नियमांचे पालन करण्यासाठी तीन दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. "SAFE FOOD, HEALTHY MAHARASHTRA" अभियानांतर्गत अन्न व औषध प्रशासन विभागाने जनजागृती आणि अंमलबजावणी मोहीम सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवली विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रशांत देशमुख यांनी हॉटेल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. बैठकीत ग्राहकांना मोफत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, स्वच्छता राखणे, अन्न सुरक्षा नियमांचे पालन करणे, परवान्यांचे नूतनीकरण करणे आणि खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. शासनाच्या नियमांची तीन दिवसांत काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देत, नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. दरम्यान, हॉटेल व्यावसायिकांनी या उपक्रमाचे स्वागत करत, आवश्यक सुधारणा दोन ते तीन दिवसांत पूर्ण करण्याची ग्वाही दिली. ग्राहकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही; नियमांचे काटेकोर पालन करण्याचे प्रशासनाचे आवाहन आहे.

आयुक्त तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वात अन्न व औषध प्रशासन राज्यभरात धडक कारवाई करत असताना कल्याण-डोंबिवलीतील हॉटेलांना एफडीएकडून तीन दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे.

तुकाराम मुंढेंनी केली होती निर्णयाची घोषणा

"आपण जे अन्न खातो ती तयार करण्याची प्रक्रिया, पॅकेजिंग यासंदर्भात नियम ठरले आहेत. 2011 पासून फूड सेफ्टीचे काही नियम आहेत. हॉटेल, रेस्तराँ, ऑनलाइन प्लॅटफॉर्म हे नियम पाळतात की नाही हा महत्त्वाचा मुद्दा आहे. त्या कायद्यातर्गत आम्ही मोहीम राबवत आहोत. आम्ही एक आदेश पारित केला आहे. जे नियम पाळायचे आहेत, जी प्रक्रिया आहे ती बंधनकारक असणार आहे. ग्राहकांच्या आरोग्य संरक्षणासाठी हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे," अशी माहिती तुकाराम मुंढे यांनी दिली.

"सुरक्षित अन्न, स्वच्छ ठिकाणं आणि जबाबदार अन्न व्यवसाय यासंदर्भात आदेश पारित केले आहेत. जे नियम आहेत, त्यांची अंमलबजावणी करणं गरजेचं आहे. अन्न पौष्टिक असावे आणि सुरक्षित असावे ही जबाबदारी आमच्या विभागाची असते यातील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे हॉटेल आणि उपहारगृह आहेत. ही आस्थापना कायदा पाळतात की नाही हे महत्वाचं आहे. परवाने अनिवार्य आहेत. त्याचं पालन झाले आहे. अन्न तयार करणे , पॅकेजिंग याचे नियम आहेत. अंमलबजावणी गरजेची आहे. कारवाई केली तेव्हा गंभीर त्रुटी आढळून आल्या साफसफाई नसते, तेलाचा सारखा वापर करणं, तापमान नियंत्रणातील त्रुटी, सुरक्षित पाणी नाही'' अशी माहिती त्यांनी दिली.

महाराष्ट्रात धो धो पाऊस, 24 जिल्ह्यांमध्ये इशारा
शेतकऱ्यांसाठी मात्र आनंदाची बातमी

■मुंबई। प्रतिनिधी,



राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढला. केरळमध्ये 2 दिवस पाऊस उशीरा दाखल झाला. त्यानंतर तब्बल 15 दिवस मॉन्सून अरबी समुद्रातच होता. पुढे मॉन्सूनची वाटचाल होत नव्हती. त्यामध्येच पेरण्या रखडल्या होत्या. यंदा राज्यात उशीरा पाऊस दाखल झाला असला तरीही दमदार पाऊस हजेरी लावताना दिसत आहे.

आज राज्यातील अनेक भागात भारतीय हवामान विभागाने पावसाचा अलर्ट जारी केला. 1 जुलैपर्यंत राज्यात पावसाचा इशारा देण्यात आला. ऑरेंज अलर्ट पावसाचा जारी करण्यात आला. राज्यातील जवळपास भागात ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे.

मुंबई, ठाणे, रायगड, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर, सांगली, जळगाव, नंदुरबार, धुळे, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, जालना, अमरावती, अकोला, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशिम या जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली. पावसाचा जोर अधिक वाढण्याची शक्यता आहे. विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल. जळगावातील अंजनविहिरे गावातील झीरी नदीला पहिल्याच पावसात पूर आला असून नदीवरील बंधारा ओव्हरफ्लो झाला आहे. अंजन विहिरेसह परिसरात जोरदार पाऊस झाल्याने मोठ्या छोट्या नाल्यांना पूर आल्याने झीरी नदीला पूर आला असून बंधारा ओव्हरफ्लो झाला आहे. नदीला पूर आल्याने परिसरातील शेतामधील कोरड्यात झालेल्या बोरवेल तसेच विहिरींना देखील पाणी आल्याचे जलस्त्रोत जिवंत झाल्याचे शेतकऱ्याने सांगितले.

गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण भागात अखेर जोरदार पावसाने हजेरी लावली आहे. अनेक दिवसांपासून दमदार पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळाला असून खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना आता वेग येण्याची शक्यता आहे. काही दिवसांपासून वाढलेल्या उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे.

दरम्यान, पावसाच्या आगमनामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे. जून अखेर नंदुरबार जिल्ह्यात सरासरी 11.4 मिमी पाऊस. अक्कलकुवा तालुक्यात सर्वाधिक 33.4 मिमी पावसाची नोंद. नंदुरबार तालुक्यात 17.1 मिमी पाऊस झाला.

वसई-विरार पालिकेच्या इलेक्ट्रिक बसला भीषण आग
संपूर्ण बस जळून खाक



■मुंबइ। प्रातानधा,

वसई-विरार महापालिकेच्या परिवहन सेवेतील एका इलेक्ट्रिक बसला चार्जिंग पूर्ण झाल्यानंतर अचानक भीषण आग लागल्याची घटना शुक्रवारी (26 जून) दुपारी घडली. काही क्षणांतच आगीने संपूर्ण बसला वेढा घातल्याने बस पूर्णपणे जळून खाक झाली. सुदैवाने बसमध्ये कोणतेही प्रवासी किंवा कर्मचारी नसल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र या घटनेमुळे ई-बसच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. विरार पश्चिम येथील वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या मुख्यालयामागे परिवहन विभागाच्या इलेक्ट्रिक बससाठी चार्जिंग डेपो आहे. शुक्रवारी दुपारी सुमारे 2 च्या सुमारास डेपोमध्ये उभी असलेल्या एका इलेक्ट्रिक बसला अचानक आग लागली. सुरुवातीला धूर दिसू लागल्यानंतर काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण बस आगीच्या विळख्यात सापडली. घटनेची माहिती मिळताच डेपोतील कर्मचाऱ्यांनी तातडीने महापालिकेच्या अग्निशमन दलाला कळवले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. आगीची तीव्रता इतकी मोठी होती की ज्वाळांचे लोळ पसरले होते. जवळपास दोन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात आली. त्यानंतर कुलिंगचे कामही करण्यात आले. या आगीत इलेक्ट्रिक बस पूर्णपणे जळून खाक झाली असून लाखों रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. आग लागली तेव्हा बस डेपोमध्ये उभी असल्याने आणि त्यामध्ये कोणीही प्रवासी नसल्याने जीवितहानी टळली. आग नेमकी कशामुळे लागली, चार्जिंग प्रक्रियेदरम्यान काही तांत्रिक बिघाड झाला होता का याचा तपास संबंधित यंत्रणांकडून सुरू आहे. या घटनेनंतर महापालिकेच्या इलेक्ट्रिक बसच्या देखभाल, चार्जिंग व्यवस्था आणि सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

शिर्डीत प्रसादाच्या नावाखाली भाविकांची फसवणूक करणाऱ्यांवर तुकाराम मुंढेंचा सर्जिकल स्ट्राईक

■मुंबई। प्रतिनिधी,

शिर्डीत प्रसादाच्या नावाखाली देश-विदेशातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या श्रद्धेशी आणि आरोग्याशी खेळ करणाऱ्या पेढा व्यावसायिकांवर अन्न व औषध प्रशासनाने पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे. साई मंदिर परिसरातील खासगी पेढा विक्री केंद्रे आणि पेढा उत्पादन करणाऱ्या आस्थापनांवर टाकलेल्या धाडीत 650 किलोहून अधिक निकृष्ट दजार्चा पेढा जप्त करून नष्ट करण्यात आला आहे.

आयुक्त तुकाराम मुंढेंचे भेसळखोरांविरोधात कडक पावले

दबंग अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदाचा कारभार हाती घेतल्यानंतर राज्यातील भेसळखोरी विरोधात कडक पावले उचलली आहेत. शिर्डीच्या साई मंदिर परिसरात खाजगी दुकानदार प्रसादाच्या नावाखाली भाविकांना अतिशय निकृष्ट दर्जाच्या पेढ्यांची विक्री करत असल्याच्या तक्रारी अन्न व औषध प्रशासनाला प्राप्त झाल्या होत्या. भाविकांच्या आरोग्याला धोका पोहोचवणाऱ्या अशा घटकांवर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले होते.

धाडीत 650 किलो निकृष्ट पेढा केला नष्ट



शिर्डीत प्रसादाच्या नावाखाली देश-विदेशातून येणाऱ्या लाखो भाविकांच्या श्रद्धेशी आणि आरोग्याशी खेळ करणाऱ्या पेढा व्यावसायिकांवर अन्न व औषध प्रशासनाने पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे.

15 दिवसांत दुसऱ्यांदा मोठी कारवाई; 2 लाखांचा पेढा जप्त

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानंतर अहिल्यानगरच्या पथकाने शिर्डीत धडक धाडसत्र सुरू केले आहे. गेल्या अवघ्या 15 दिवसांत दुसऱ्यांदा प्रसादाची दुकाने आणि उत्पादन करणाऱ्या कारखान्यांवर छापा टाकण्यात आला आहे. काल दिवसभर एफडीएच्या अधिकाऱ्यांनी शिर्डीत हे धाडसत्र राबवले. या कारवाईत तब्बल 650 किलोहून अधिक वजनाचा निकृष्ट पेढा जप्त करण्यात आला आणि तो कायदेशीर प्रक्रियेनुसार नष्ट करण्यात आला. या नष्ट करण्यात आलेल्या पेढ्यांची बाजारातील किंमत सुमारे 2 लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

भेसळखोरांचे धाबे दणाणले


अन्न व औषध प्रशासनाच्या या सातत्यपूर्ण आणि धडक कारवाईमुळे शिर्डी परिसरातील भेसळयुक्त आणि निकृष्ट अन्नपदार्थ विकणाऱ्या दुकानदारांचे धाबे दणाणले आहेत. भाविकांच्या आरोग्याशी खेळ खपवून घेतला जाणार नाही, असा कडक इशारा या कारवाईच्या माध्यमातून देण्यात आला आहे. आगामी काळातही हे धाडसत्र अधिक तीव्र केले जाईल, असे संकेत प्रशासनाकडून मिळाले आहेत.

बोगस बियाणे-खत विक्रेत्यांवर मकोका?
पावसाळी अधिवेशनात विधानसभेत घडलं काय? बळीराजाची फसवणूक थांबणार?

मान्सून सक्रिय झाल्यापासून राज्यात सर्वदूर समाधानकारक पाऊस पडला आहे.
शेतकऱ्यांना आता खरीप पिकाच्या पेरणी करायची आहे.त्यासाठी बि-बियाणे खरेदीसाठी गर्दी होत आहे.
त्याचवेळी बोगस बि-बियाणे विक्रेत्यांवर मोठी कारवाईची मागणी रेटण्यात आली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यात सर्वदूर मान्सून सक्रिय झाला आहे. मान्सूनने राज्य व्यापले आहे. दमदार पावसाने शेती मशागतीला आणि पेरणीला वेग आला आहे. दोन दिवसांच्या पावसामुळे शेतकऱ्यांनी बि-बियाणे, खते आणि इतर साहित्य खरेदीसाठी दुकानांकडे मोर्चा वळवला आहे. पण त्याचवेळी बोगस बि-बियाणे, खतांच्या विक्रीचाही धोका आहे. सरकारने अनेकदा कारवाई करून, सक्त नियम करूनही बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची मोठी फसवणूक होते. तर काही ठिकाणी बि-बियाणे विक्रेत्यांवर कृषी विभागाकडून डोळे झाक होत असल्याची ओरड शेतकऱ्यांमधून होते. त्यातच बोगस बियाणे-खत विक्रेत्यांवर 'मकोका' लावा अशी मागणी उद्धव ठाकरे गटाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी विधानसभेत केली आहे.



या टोळ्यांवर मकोकाच लावा

या पावसाळी अधिवेशनात उमरगा-लोहारा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी शेतकरी प्रश्नावर सरकारचे लक्ष वेधले.बोगस बियाणे आणि खतांची निर्मिती व विक्री करणाऱ्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे सांगत, अशा टोळ्यांवर 'मकोका'सारखा कठोर कायदा लागू करून कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी विधानसभेत केली. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना कोणतीही दया न दाखवता कठोर शिक्षा व्हावी, तसेच बोगस बियाणे व खतांचा काळाबाजार कायमचा बंद करण्यासाठी प्रभावी कायदेशीर उपाययोजना कराव्यात, अशीही त्यांनी सरकारकडे मागणी केली आहे. आता सरकार त्यांच्या या मागणीवर यासंबंधी कठोर निर्णय घेते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

एचटीबीटी बियाण्यांवर कृषी विभागाचे लक्ष

या खरीप हंगामात बळीराजाची फसवणूक टाळण्यासाठी कृषी विभाग सक्रिय झाला आहे. बोगस बियाणे, खतांचा काळाबाजार आणि अनधिकृत एचटीबीटी- तणनाशक सहनशील बियाणांविरुद्ध कृषी विभागाने कंबर कसली आहे. नियम मोडणाऱ्या विक्रेत्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल होणार आहे. एचटीबीटी कापूस बियाणांच्या छुप्या विक्रीवर प्रशासनाची करडी नजर आहे. केंद्र सरकारच्या जीईएससी समितीची मान्यता नसलेली बियाणे ही जमिनीची सुपिकता नष्ट करतात आणि पर्यावरणाला घातक असल्याचे मानले जाते. आशा बियाणांचा साठा आढळल्यास संबंधितांविरोधात आता पर्यावरण संरक्षण कायदा 1986 अंतर्गत कठोर कारवाई केली जाणार आहे.

फुटीर खासदारांना जोरदार टोला

उद्धव ठाकरे हे २८ जून रोजी धाराशिव दौऱ्यावर आहेत. या पार्श्वभूमीवर ठाकरे शिवसेनेचे उमरगा मतदारसंघाचे आमदार प्रवीण स्वामी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट केली आहे. त्यांनी पोस्ट केलेले बॅनर सध्या चांगलेच चर्चेत आले आहे. बॅनरवरील ''फुटीने बदलतात ते आकडे... शिवसैनिकांची निष्ठा नाही!'' असे त्यांचे बॅनर एकदम चर्चेत आले आहे.

या बॅनरमधून त्यांनी खासदार ओमराजे निंबाळकर यांना अप्रत्यक्षपणे लक्ष्य केले आहे ''फुटल्याने शिवसैनिकांची निष्ठा बदलणार नाही,'' असा स्पष्ट संदेश देत ठाकरे गटाने आपल्या कार्यकर्त्यांना एकजूट राहण्याचे आवाहन केले आहे. या पोस्टमधून दिसून येत आहे. दरम्यान, २८ जून रोजी उद्धव ठाकरे यांच्या धाराशिव दौऱ्यापूर्वी हे बॅनर व्हायरल झाल्याने जिल्ह्यात ठाकरे शिवसैनिक चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसत आहे.

छत्रपती संभाजीनगरात मिशन हातोडा
एका दिवसात ४९ कॅफे झाले उध्वस्त, नेमकं कारण जाणून घ्या

छत्रपती संभाजी नगरात 3 दिवसापूर्वी एक कॅफे मध्ये मुलीवर अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली,
यामुळं खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने आता ऑपरेशन हॅमर सुरू केले आहे.. यात ज्या ज्या कॅफे मध्ये तरुणाईला प्रायव्हसी च्या नावावर बसायला आडोसा मिळतो तिथं थेट हातोडा पडायला सुरुवात झाली आहे.



■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,

छत्रपती संभाजी नगरात 3 दिवसापूर्वी एक कॅफे मध्ये मुलीवर अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली, यामुळं खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने आता ऑपरेशन हॅमर सुरू केले आहे.. यात ज्या ज्या कॅफे मध्ये तरुणाईला प्रायव्हसी च्या नावावर बसायला आडोसा मिळतो तिथं थेट हातोडा पडायला सुरुवात झाली आहे मंगळवारी एक दिवसात प्रशासनाने 49 कॅफे उध्वस्त केले आहेत..

छत्रपती संभाजी नगरात सध्या कॅफेवर अशा पद्धतीने हातोडा पडतोय, ज्या ज्या कॅफे मध्ये तरुणाईला बसायला आडोसा , प्रायव्हसी जागा केल्या आहेत त्या जागा आता महापालिका आणि पोलिसणी संयुक्तपणे उध्वस्त करायला सुरुवात केली आहे, 3 दिवसापूर्वी एक अल्पवयीन तरुणीवर कॅफे मध्ये अत्याचार झाल्या ची घटना घडली आणि प्रशासनाने या सर्व कॅफे उध्वस्त करण्याची मोहीम सुरू केली, मंगळवारी संध्याकाळी शहरातील सिडको, वेदांत नगर, हर्सूल सह अनेक भागातील तब्बल 49 कॅफेवर एकाच वेळी कारवाई सुरू झाली.

यात लपून बसायचा सर्व जागा महापालिकेने अक्षरशः फोडून काढल्यात, या कारवाईत कॅफेत अनेक धक्कादायक गोष्टी पुढं आल्या बसायला फारच एकांत अशी जागा, टेबल टेबल प्रमाणे लावलेले पडदे इतकंच नाही तर काही ठिकाणी दारूच्या बाटल्या आणि कॉंट्रॅसेपटिव्ह गोळ्या सुद्धा आढळून आल्याची माहिती प्रशासनाने दिलीय कॅफे यासाठी नाही असे सांगत महापालिकेने ही धडक कारवाई सुरू केली...

मुलीवर कॅफेमध्ये अत्याचार झाल्यानंतर प्रशासन लागले कामाला

पोलिसांनी गेली 2 दिवस असल्या सगळ्या कॅफेची रेकी केली त्याची एक यादी बनवली आणि महापालिकेच्या साहाय्याने ही कारवाई सुरू केली.. यापुढं एकही कॅफेत असले गैर प्रकार खपवून घेतले जाणार नाही असा इशारा पोलिसांनी दिलाय.


कॅफे म्हणजे गप्पा मारणे, कॉफी चा आस्वाद घेणारी जागा, मात्र याच जागा काही समाजकंटकांनी त्यांच्या गैर कृत्यांचे अड्डे केले होते त्यातून आता प्रशंसा सरसावले आहे, कुठं असला प्रकार चालत असेल तर नागरिकांनी तक्रारी करावी कारवाई अटळ आहे असा इशारा दिलाय, त्यामुळं संभाजी नगरात सध्या ऑपरेशन हॅमर ची जोरदार चर्चा सुरू आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

देणग्यांची नाही ही तर विश्वासाची लूट



रामाच्या नावाने उभारलेल्या या भव्य मंदिराभोवती जर भ्रष्टाचार, अपारदर्शकता आणि आर्थिक अनियमिततेच्या सावल्या दिसू लागल्या, तर त्याची चौकशी आणि सत्य समोर येणे हे लोकशाही तसेच धार्मिक उत्तरदायित्वाच्या दृष्टीने अपरिहार्य ठरते.

अयोध्येतील राम मंदिर हे केवळ एक धार्मिक स्थळ नाही, तर कोट्यवधी भारतीयांच्या श्रद्धा, भावना आणि सांस्कृतिक अस्मितेचे प्रतीक आहे. प्रभू श्रीराम भारतीय जनमानसात सत्य, न्याय, त्याग, कर्तव्यनिष्ठा आणि मर्यादा यांचे आदर्श मानले जातात. त्यामुळे राम मंदिराशी संबंधित प्रत्येक निर्णय, प्रत्येक व्यवहार आणि प्रत्येक रुपयाचा हिशोब हा केवळ प्रशासकीय किंवा आर्थिक बाब नसून जनतेच्या विश्वासाशी निगडित विषय ठरतो. अशा परिस्थितीत मंदिरासाठी भक्तांनी अर्पण केलेल्या देणग्यांमध्ये गैरव्यवहार झाल्याच्या आरोपांनी, चांदीच्या विटा गायब झाल्याच्या दाव्यांनी, हिरे-दागिन्यांच्या नोंदींतील विसंगतींनी आणि निधीच्या वापरातील पारदर्शकतेवर उपस्थित झालेल्या प्रश्नांनी गंभीर चिंतेचे वातावरण निर्माण केले आहे. कारण येथे केवळ पैशांचा हिशेब नाही, तर लाखो-कोट्यवधी भक्तांच्या श्रद्धेचा आणि सार्वजनिक विश्वासाचा प्रश्न आहे. रामाच्या नावाने भावनिक लाट निर्माण करून राम मंदिर आंदोलन उभे करणे हा देशाच्या राजकारणातील सर्वात मोठा राजकीय प्रयोग मानला जातो. रामाच्या नावावर मते मागून, निवडणुका जिंकल्या, राज्यात सरकारे आणली आणि अखेरीस दिल्लीची सत्ता मिळवण्यातही यश आले. त्यामुळे राम मंदिराचा मुद्दा हा श्रद्धेइतकाच किंबहुना त्यापेक्षा जास्त राजकारणाशीही जोडला गेला होता. रामाच्या नावावर उभी राहिलेली राजकीय व्यवस्था सुशासन आणण्यासाठी नाही तर रामाच्या नावाखाली लोकांची लूट करून आपली तुंबडी भरण्यासाठी केलेली होती का? राम मंदिर ट्रस्टचे विश्वस्त आणि भाजपच्या काही नेत्यांनी जिथे मंदिर होणार आहे तिथे काही जमिनी घेतल्या. २ कोटी रुपयांना घेतलेली जमीन ट्रस्टला १८ कोटी रुपयांना विकून एका तासात १६ कोटी रुपयांचा नफा कमावल्याची प्रकरणे समोर आली. देशभरातील कोट्यवधी लोकांनी राम मंदिर उभारणीसाठी आपल्या कष्टाच्या कमाईतून ३ हजार ५०० कोटींहून अधिकची रक्कम देणगी म्हणून दिलेली आहे. यासोबतच सोने, चांदी, हिरे आणि दागिने किती मिळाले त्याचा हिशोब ट्रस्टने कधी दिला नाही. मंदिराच्या बांधकामातील दर्जाबाबत प्रश्न उपस्थित झाले. पहिल्याच पावसात परिसरातील रस्ते खचल्याच्या, गर्भगृहात पाणी गळती झाल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या. राम मंदिरासाठी देशभरातून रोख रक्कम, सोने, चांदी, दागिने आणि विविध स्वरूपातील मौल्यवान वस्तू अर्पण करण्यात आल्या. अनेकांनी आयुष्यभराची बचत श्रद्धेने अर्पण केली. ग्रामीण भागातील महिलांनी आपल्या गाठीशी असलेली रक्कम दिली. पण विश्वस्तांनी केलेल्या देणग्यांतील घोटाळ्यांमुळे भक्तांच्या विश्वासाला तडा गेला आहे. राम मंदिरासाठी अनेक वर्षांपासून संघ आणि भाजपशी संबंधित अनेक संस्था आणि लोक रोख रक्कम, सोने आणि चांदीच्या विटा गोळा करत होते. त्याचे पुढे काय झाले? त्या कुठे गेल्या याचा हिशोब कधीच समोर आला नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर केंद्र सरकारने ट्रस्ट स्थापन केले, त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अत्यंत विश्वासू माजी सनदी अधिकारी नृपेंद्र मिश्रा, संघाशी संबंधित चंपत राय आणि गोविंदगिरी महाराज यांच्यासह संघ आणि भाजपशी संबंधित लोक आहेत. विविध माध्यमांतून आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार या प्रकरणाच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने आपल्या २० पानांच्या अहवालात काही बड्या पदाधिकाऱ्यांसह १७ जणांना आरोपी केले असून, तपासादरम्यान १० लाख रुपयांची रोकडही जप्त केली आहे. मंदिरातील पैसे मोजण्याच्या प्रक्रियेत गुंतलेल्या काही कर्मचाऱ्यांची संपत्ती अचानक वाढल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. हे कर्मचारी काही विश्वस्तांचे जवळचे नातेवाईक असून त्यांच्या शिफारशीनेच नोकरीला लागले आहेत. घोटाळ्याबाबत माहिती असूनही वा ट्रस्ट असूनही त्यांनी कोणतीही ठोस कारवाई केली नाही. त्यामुळे ट्रस्ट आणि त्यांची नेमणूक करणारे केंद्र सरकारच्या पाठिंब्यानेच हे सर्व सुरू आहे का? असा प्रश्न पडतो. ज्या राजकीय व्यवस्थेने भ्रष्टाचाराविरोधात झिरो टॉलरन्सची भाषा केली, तीच व्यवस्था या प्रकरणात पूर्ण पारदर्शक चौकशीबाबत मौन का बाळगते आहे, हा प्रश्न उपस्थित होतो. जर कोणताही गैरव्यवहार झाला नसेल तर स्वतंत्र चौकशीची भीती कशाला? आणि जर आरोप निराधार असतील तर ते तथ्यांसह जनतेसमोर मांडण्यात अडचण काय? राम मंदिर हे कोणत्याही पक्षाची खासगी मालमत्ता नाही. ते संपूर्ण हिंदू समाजाच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. त्यामुळे मंदिराच्या व्यवस्थापनावर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे रामावर प्रश्न उपस्थित करणे नव्हे. राम मंदिरातील देणग्याच्या घोटाळ्याबाबत प्रश्न विचारणाऱ्यांना उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री अयोध्येचा अपमान केला म्हणत आहेत. पण मंदिरात श्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या संघटित लुटीबाबत योगी आदित्यनाथ, संघ आणि भाजपचे लोक मूग गिळून गप्प आहेत.

ईडीने दिली टाळी, आता केरळची पाळी!

केरळचे माजी मुख्यमंत्री पी. पिनराई विजयन यांची मुलगी वीणा विजयन ईडीच्या चौकशीत आहे. वीणा विजयन यांना कोचिंन मिनिरल्स अँड ऋतिल लिमिटेड (सीएमआरएल) प्रकरणात मनी लॉन्डरिंग (पीएमएलए) चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. त्यांची आयटी कंपनी एक्सलॉजिक सोलुशन्सला सीएमआरएल कडून सुमारे दोन कोटीच्या संशयास्पद पेमेंट्सचा तपास सुरू आहे. १७ जून २०२६ रोजी कोचीतील ईडी कार्यालयात त्या हजर झाल्या आणि जवळपास १० तास चौकशी झाली. पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता. हे प्रकरण केरळ राजकारणात मोठी खळबळ उडवणारे आहे. ईडीचा दावा आहे की हे पेमेंट्स संशयास्पद व्यवहारांशी संबंधित आहेत. वीणा यांनी यापूर्वीही समन्स प्राप्त केले होते. केरळचे राजकारण, भाजपची राष्ट्रीय रणनीती, आणि गेल्या एक दशकात ईडीचा राजकीय हत्यार म्हणून कसा वापर झाला, हे आठवलं तर ईडीने दिली टाळी आता केरळची पाळी हेच घडेल असं वाटतंय. २७ मे २०२६. पहाटेच्या अंधारात केरळच्या राजधानी तिरुवनंतपुरममध्ये अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) गाड्या एकाच वेळी अनेक दिशांनी निघाल्या. माजी मुख्यमंत्री पिनराई विजयन यांचे निवासस्थान, त्यांच्या मुलीचे घर, जावयाचे निवासस्थान सगळीकडे एकाच वेळी धाडी. केरळच्या राजकीय इतिहासात असे कधी घडले नव्हते. काही वेळातच रस्त्यावर सीपीआय (एम) चे हजारो कार्यकर्ते उतरले, ईडीच्या गाड्यांवर दगडफेक झाली, काचा फुटल्या. अजय देवगण यांच्या 'रेड' सिनेमासारखे दृश्य चक्क प्रत्यक्षात केरळ मध्ये दिसत होतं. आपल्या नेत्याची निवडणुकीत पार विल्हेवाट लागलेली असताना आता हे ईडी काय भानगड हेच कार्यकर्त्यांना कळे ना! कार्यकर्त्यांनी गाडी फोडून, त्या ईडीच्या अधिकाऱ्यांची पळता भुई थोडी केली खरी पण या हिंसाचारापलीकडे पाहता एक प्रश्न मनात आला. हे केवळ एका भ्रष्टाचाराच्या तपासाचे छापे होते की भारतीय जनता पक्षाच्या केरळ जिंकण्याच्या दीर्घकालीन रणनीतीचा एक महत्त्वाचा टप्पा? कारण महाराष्ट्रापासून मध्यप्रदेश पर्यंत आणि गोव्या पासून आसाम पर्यंत असंच काहीसं घडत आलंय आणि वर्षे दोन वर्षात सत्ता पालट झालंय.

प्रकरण काय आहे? प्रकरणाचा गाभा कुठे आहे?

ईडीची कारवाई कोचिंन मिनिरल्स अँड ऋतिल लिमिटेड (सीएमआरएल) आणि एक्सलॉजिक सोलुशन्स या कंपन्यांशी संबंधित मनी लॉँड्रिंग प्रकरणात आहे. आरोप असा की सीएमआरएल या खनिज उत्खनन कंपनीने (ज्यात केरळ सरकारचाही १३.४% हिस्सा आहे) विजयन यांची मुलगी टी. वीणा हिच्या एक्सलॉजिक सोलुशन्स या आयटी कंपनीला २०१७ ते २०२१ दरम्यान सुमारे रु.१.७ कोटी दिले. परंतु कोणतीही सेवा न घेता. म्हणजे हे "बनावट व्यवहार" होते, असा ईडीचा दावा आहे. एप्रिल २०२५ मध्ये सिरीयस फ्रॉड इन्वेस्टीगेशन ऑफिस (एसएफआयओ) ने वीणा विजयन आणि २६ जणांविरुद्ध कॉर्पोरेट फ्रॉड चार्जशीट दाखल केली. त्यानंतर सीएमआरएलने ईडी तपास रद्द करण्यासाठी केरळ हायकोर्टात याचिका दाखल केली. परंतु २६ मे २०२६ रोजी हायकोर्टाने ती याचिका फेटाळली आणि अवघ्या एका दिवसात, म्हणजे २७ मे रोजी, ईडीने एकाच वेळी १२ ठिकाणी धाडी घालून रु.१८.३६ कोटी जमा असलेली २४२ बँक खाती गोठवली, डिजिटल पुरावे जप्त केले आणि वीणा यांचा फोन ताब्यात घेतला. हायकोर्टाचा निर्णय आणि धाडींमधील हे अवघ्या एका दिवसाचं अंतर निव्वळ योगायोग आहे, असे मानणे भाबडेपणाचे ठरेल.

भाजपसाठी सर्वात कठीण राज्य केरळ आणि तेथील राजकारणाचे गणित

केरळ भारतातील एकमेव राज्य होते जिथे गेल्या पाच दशकांपासून डावे पक्ष सत्तेत यायचे. हिंदू बहुसंख्य असलेल्या या राज्यात उजव्या विचारसरणीला कधीच मोठे यश मिळाले नव्हते. १४० जागांच्या विधानसभेत भाजपला एकही जागा नव्हती, किंवा कधी एखादी जागा



सध्याची परिस्थिती अशी आहे की
केरळमध्ये काँग्रेस सत्तेत आहे, एलडीएफ विरोधात आहे आणि भाजप अद्याप सत्तेपासून दूर आहे. परंतु २०२६ च्या निवडणुकीत भाजपने काही जागांवर वाढ केली असेल. पुढील निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा २०३१ विधानसभा त्यासाठी आत्ताच जमीन तयार होत आहे.

मिळाली तरी ती टिकवता आली नाही. २०२६ च्या निवडणुकीत भाजपने ख्रिश्चन मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. सायरो-मलाबार बेल्ट मधील मतदारसंघांमध्ये ख्रिश्चन उमेदवार उभे केले. परंतु कंजिराप्पाली, पूनजर, पाला, थ्रिव्हल्ला या सर्व महत्त्वाच्या जागांवर पराभव झाला. अखेरीस निकाल असा लागला की काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युडीएफने १०२ जागा जिंकल्या, एलडीएफ ला केवळ ३५ जागा मिळाल्या ज्यात सीपीआय (एम) चे फक्त २६ आमदार निवडून आले. विजयन यांच्या २१ सदस्यांच्या आणि मंत्रिमंडळातील तब्बल १३ मंत्र्यांचा दणकून पराभव झाला. या निकालात भाजपचा स्वतःचा फारसा उदय झाला नाही. काँग्रेस सत्तेत आली, एलडीएफ विरोधात बसली. मग भाजपला या क्षणी विजयन यांच्यावर धाड का घालायची होती? कारण हे केवळ आजचे राजकारण नाही, हे २०३१ साठीची जमीन तयार करण्याचे काम आहे.

ईडी सीबीआय आणि आय टी राजकीय हत्यार की स्वायत्त संस्था?

भाजपा सत्तेत आल्यापासून गेल्या बारा वर्षात सर्वाधिक वेळा आपल्या विरोधकांना ताब्यात आणण्यासाठी भाजपाने सरकारी यंत्रणांचा वापर केला आहे. त्यामुळे सीबीआय आय टी आणि ईडी ह्या आता राजकीय हत्यार म्हणून वापरल्या जातात का हा प्रश्न आता केवळ विरोधकांचा आरोप राहिलेला नाही. तर त्याचे पुरावेही समोर आहेत. मार्च २०२३ मध्ये १४ विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यातील आकडेवारी धक्कादायक होती. २०१४ पासून ईडीने १२१ राजकीय नेत्यांचे तपास केले, त्यापैकी ११५ म्हणजे तब्बल ९५% विरोधी पक्षांचे होते. या याचिकेत आणखी एक महत्त्वाचे निरीक्षण होते जे विरोधी नेते नंतर भाजपमध्ये सामील झाले, त्यांच्यावरील तपास मंदावला किंवा थांबला. हे निव्वळ आरोप आहेत असे म्हणणे कठीण आहे, कारण ऐतिहासिक उदाहरणे स्पष्ट आहेत. महाराष्ट्र ही तर याची सर्वात मोठी प्रयोगशाळा म्हणावी लागेल. उदाहरण द्यायचे झाले तर राष्ट्रवादीचे प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे अगदी स्वर्गीय अजीत पवार हे नेते. साखर कारखाने आणि सहकारी बँकांमधील अनियमिततेबद्दल ईडीने त्यांच्या मालमत्तांवर छापे घातले. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये अजित पवार भाजपच्या एनडीए आघाडीत उपमुख्यमंत्री म्हणून दाखल झाले. छगन भुजबळ यांनी सांगितले की ईडीच्या सततच्या नोटिसांमुळे त्यांना अजित पवारांच्या गटात जाण्याशिवाय पर्याय नव्हता. राष्ट्रवादीच्या ९ बंडखोर आमदारांपैकी ४ जण अजित पवार, प्रफुल्ल पटेल, भुजबळ, हसन मुश्रीफ भाजपसोबत जाण्यापूर्वी ईडीच्या मनी लॉँड्रिंग तपासाखाली होते. एकनाथ शिंदे यांनी स्वतः हे मान्य केले की "ईडीच्या भीतीने भाजपकडे येऊ नका" हे विधान खुद्द भाजपच्या मित्रपक्षाने केले हे विचार करण्यासारखे आहे. झारखंड मध्ये २०२४ च्या झारखंड निवडणुकीच्या काळात ईडीने मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या निकटवर्तीवर धाड घातली. मतदानाच्या आदल्या दिवशी झारखंडमध्ये ईडीच्या कारवाया झाल्या. झारखंड मुक्ती मोर्चा ने हे "बांगलादेशी घुसखोरी नॅरेटिव्ह" रुजवण्यासाठी भाजपचा डाव असल्याचा आरोप केला. त्या निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चा परत सत्तेत आले, हा भाग वेगळा परंतु कारवाईचा पॅटर्न तोच होता. आसाम, बंगाल, दिल्ली या राज्यांमध्येही निवडणुकांच्या तोंडावर किंवा विरोधी नेत्यांना कमकुवत करण्यासाठी ईडी-सीबीआयच्या कारवाया झाल्याचे दिसून आले आहे. दिल्लीत तर मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना थेट ईडीने अटक केली होती. मुख्यमंत्री पदावर असलेल्या माणसाला अशी सूड बुद्धीने वागणूक देणारा भाजपा हा एकमेव राजकीय पक्ष असेल. पश्चिम बंगालमध्ये तृणमूलच्या नेत्यांवर सातत्याने कारवाया होत असतात. त्यामुळे जिथे जिथे विरोधक ताकदवान तिथे तिथे भाजपाने ईडीची कारवाई केली आणि केले बदनाम हेच पाहायला मिळाले आहे.

भाजपची केरळ रणनीती तीन आघाड्यांवरील लढाई

भाजपला केरळ जिंकायचे आहे. परंतु केरळ हे साधे राज्य नाही. इथे हिंदू ५३%, मुसलमान २७% आणि ख्रिश्चन जवळपास २०% आहेत. अल्पसंख्याक समुदायांचे एकगठ्ठा मतदान इथे परंपरेने निर्णायक असते. त्यामुळे भाजपची रणनीती तीन आघाड्यांवर चालते. पहिली आघाडी सीपीआय (एम) ची बदनामी करून त्यांना नामोहरम करणे. विजयन यांच्यावरील ईडी छापे हे केवळ वीणा विजयन प्रकरणापुरते नाहीत. तर सीपीआय (एम) ही भ्रष्ट पार्टी आहे हा संदेश केरळच्या मतदारांपर्यंत पोहोचवायचा आहे. एलडीएफ आधीच २०२६ च्या निवडणुकीत ३५ जागांवर आलेला आहे. आता ईडी छाप्यांमुळे विजयन आणखी बचावात्मक स्थितीत येतील. सीपीआय (एम) जेव्हा "राजकीय सूड" म्हणतो, तेव्हा मतदार विचार करतील "धूर असेल तरच आग असेल." हा मनोवैज्ञानिक परिणाम भाजपला हवा आहे. दुसरी आघाडी काँग्रेसला कमकुवत करणे. केरळमध्ये सध्या काँग्रेस सत्तेत आहे. युडीएफ ला १०२ जागा मिळाल्या आहेत. परंतु युडीएफ मध्ये काँग्रेस, आययुएएल आणि केरळ काँग्रेस आहेत. जर भाजप मुस्लीम मतदार काँग्रेसपासून तोडू शकला, किंवा ख्रिश्चन मतदारांचा काही भाग आपल्याकडे वळवू शकला, तर पुढील निवडणुकीत त्यांना थेट फायदा होऊ शकतो. आणि तिसरी आघाडी हिंदू एकत्रीकरण. केरळमध्ये नायर, एज्हावा, ब्राह्मण अशा अनेक हिंदू जाती आहेत. साबरिमाला प्रकरणात भाजपने हिंदू भावना भडकवण्याचा प्रयत्न केला होता. ईडी प्रकरण त्याच दिशेने एक पाऊल आहे. विजयन यांच्यावर हल्ला म्हणजे अप्रत्यक्षपणे "डाव्या भ्रष्टाचाराविरुद्ध हिंदू हित" हा नॅरेटिव्ह उभा करण्याचा प्रयत्नआहे. केरळमध्ये ५३% हिंदू असूनही ते एकगठ्ठा मतदान भाजपाला का करत नाहीत हे त्यांचे खरे दुःख आहे आणि म्हणूनच या हिंदूंना जागृत करण्यासाठी भाजपा मुस्लिम आणि ख्रिश्चनांना भडकावून आता तिथे असुरक्षिततेच वातावरण निर्माण करेल आणि हिंदूंना एकवटून पुढील निवडणुकीपर्यंत आपल्या बाजूला वळवेल.

सीपीआय (एम) चे म्हणणे राजकीय सूड की खरेच भ्रष्टाचार?

सीपीआय (एम) चे राष्ट्रीय सरचिटणीस एम ए बेबी यांनी हे छापे "भाजपा सरकारकडून विरोधी नेत्यावर केलेला लक्ष्यित हल्ला" असल्याचे म्हटले. "यामुळे पिनराई विजयन वा सीपीआय (एम) घाबरणार नाही," असे ते म्हणाले. विजयन यांचे जावई व माजी मंत्री पीए मोहम्मद रियास यांनी समाजमाध्यमावर लिहिले "आम्ही अखेरच्या श्वासापर्यंत लढू." परंतु सीपीआय (एम) ची ही भूमिका काहीशी अडचणीत सापडल्याची ग्वाही देणारी वाटतेय. कारण याच पक्षाने इतर राज्यांमध्ये विरोधी नेत्यांवर ईडी कारवाई होताना "ही भ्रष्टाचाराविरुद्ध कारवाई आहे" असे म्हटले नव्हते. आता स्वतःच्या नेत्यावर कारवाई होताना "राजकीय सूड" म्हणायचे हे थोडे पोकळ वाटते. तसेच काँग्रेसने एक वेगळाच आरोप केला होता विजयन यांनी केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन यांना नाश्त्यासाठी बोलावले, केंद्रीय मंत्र्यांशी अधिकाऱ्यांशिवाय गुप्त बैठका घेतल्या म्हणजे स्वतःच्या मुला-मुलींवरील ईडी कारवाई थांबवण्यासाठी भाजपशी गुप्त "डील"केल्याचा संशय व्यक्त केला. जर हे खरे असेल, तर सीपीआय (एम)-भाजपा नेक्सस हे काँग्रेसचे आरोप किती खोल जातात, हे लक्षात येते.

"ऑपरेशन लोटस" एक सुपरिचित पॅटर्न

भाजपने "ऑपरेशन लोटस" ही रणनीती गेल्या दशकात अनेकवेळा वापरली. कर्नाटक, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गोवा अनेक राज्यांमध्ये ईडी किंवा सीबीआयच्या भीतीने विरोधी आमदार भाजपकडे खेचले गेले, सरकारे कोसळली. केरळमध्ये हा पॅटर्न थेट वापरणे कठीण आहे. कारण सीपीआय (एम) कार्यकर्ते संघटित आहेत, पक्षशिस्त कठोर आहे. एखाद्या आमदाराला "फोडणे"इतके सोपे नाही. परंतु एलडीएफ ला आधीच फक्त ३५ आमदार आहेत. त्यांना आणखी कमकुवत करायचे असेल, तर त्यांच्या सर्वोच्च नेत्याला सतत कायदेशीर अडचणींमध्ये गुंतवून ठेवणे हाच मार्ग आहे. नेता बचावात्मक असेल, तर पक्षही बचावात्मक असतो. पण येथे एक महत्त्वाचा प्रश्न पडतो जर वीणा विजयन प्रकरणात खरेच गैरव्यवहार झाला असेल, तर ईडीने तपास करणे योग्यच आहे. कायद्यापुढे कोणीही मोठा नाही. परंतु त्याचवेळी हेही विचारले पाहिजे जर विजयन यांनी इतर देशभरातील विरोधी पक्ष नेत्याप्रमाणे भाजपमध्ये सामील झाले किंवा एनडीएमध्ये पक्ष जोडला तर इतर नेत्यांचे तपास जसे थांबले तसे विजयन यांचेही तपास थांबणार ना? महाराष्ट्रात अजित पवार भाजपमध्ये गेल्यावर त्यांच्यावरील तपासाच काय झाल? भुजबळ यांनी स्वतः सांगितले की ईडीच्या दबावामुळे त्यांनी पक्ष बदलला. जर तपास राजकीय सोयीनुसार थांबतो किंवा सुरू राहतो, मग ईडी ही स्वायत्त संस्था राहत नाही ती केंद्र सरकारचे राजकीय हत्यार बनते. हे लोकशाहीसाठी घातक आहे. कारण असे झाले तर विरोधी पक्षांकडे दोनच पर्याय राहतात एकतर भाजपमध्ये सामील व्हा, नाहीतर सतत तपासात अडकलेले राहा. हे लोकशाहीचे नाही, हे धमकावण्याचे राजकारण आहे.

केरळ मध्ये २०३१ ची लढाई सुरू झाली

सध्याची परिस्थिती अशी आहे की केरळमध्ये काँग्रेस सत्तेत आहे, एलडीएफ विरोधात आहे आणि भाजप अद्याप सत्तेपासून दूर आहे. परंतु २०२६ च्या निवडणुकीत भाजपने काही जागांवर वाढ केली असेल. पुढील निवडणूक स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा २०३१ विधानसभा त्यासाठी आत्ताच जमीन तयार होत आहे. ईडी छाप्यांचे राजकीय परिणाम तीन टप्प्यांत होतात. पहिला म्हणजे तात्कालिक प्रतिमा नुकसान विजयन "संशयित" म्हणून चर्चेत राहतात. दुसरा म्हणजे कायदेशीर गुंतागुंत वीणा विजयन यांच्यावर आरोप सिद्ध झाले नाही तरी न्यायालयीन प्रक्रियेत वर्षे जातात. तिसरा म्हणजे सीपीआय (एम) ची ऊर्जा ओसरते नेते सतत "बचाव मोड"मध्ये राहतात, तेव्हा पक्षाची रचनात्मक काम करण्याची क्षमता कमी होते. पिनराई विजयन दोषी आहेत की नाही, हे न्यायालय ठरवेल. वीणा विजयन यांनी खरेच गैरव्यवहार केला की नाही, हे तपासात निघेल. परंतु एक प्रश्न आत्ताच उत्तराची मागणी करतो ईडी ही संस्था स्वायत्तपणे काम करत आहे का, की तिला राजकीय हेतूने वापरले जात आहे? केरळचे मतदार शिक्षित आहेत, जागरूक आहेत. त्यांनी भाजपला वारंवार नाकारले आहे. ते नाकारत राहतील का, हे त्यांच्यावर अवलंबून आहे. परंतु इतिहास सांगतो ज्या राज्यांमध्ये ईडीचा राजकीय वापर झाला, त्या राज्यांमध्ये सत्तांतरे झाली, पक्ष फुटले, नेते झुकले. ईडीने टाळी दिली आहे. आता केरळची पाळी आहे की नाही हे उत्तर केरळचेच मतदार देतील. आणि ते उत्तर संपूर्ण देशाला दिशा देईल.

आनंदमेघ नि चिंतेचे मळभ

यंदा मुळातच 'एल निनो'मुळे महाराष्ट्रासह बारा राज्यांत सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज आहे. जूनची सरासरी पावसाने गाठलेली नाही. मंगळवारी मान्सूनच्या आगमनाची दवंडी घेऊन राज्याच्या विविध भागांमध्ये आनंदसरी कोसळल्या.

पंधरा दिवसांच्या विलंबाने का होईना, राज्यात मान्सूनच्या आगमनाची आनंदवार्ता मिळाली. त्यामुळे राज्यातील नागरिक सुखावून जाणे साहजिकच. गेले काही दिवस कोरड्या वाऱ्यांमुळे मान्सून कोकणातच रेंगाळला होता. आता पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यांनी त्याच्या प्रवासाला गती मिळाली. त्यामुळे कोकण, मध्य महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, खान्देश आणि विदर्भ-मराठवाड्यात मान्सूनचे ढग पोहोचले आहेत. येत्या दोन दिवसांत उर्वरित भागांतही ते दाखल होतील. त्यानंतर पुन्हा काही दिवस तो विश्रांती घेईल, असा हवामानशास्त्र विभागाचा अंदाज आहे. मान्सून दाखल झाला असला, तरी पुढील काळात पाऊस कसा होणार, याची शाश्वती नसल्याने अजूनही चिंतेचे मळभ पूर्णपणे दूर झालेले नाही. कोरड्या जमिनीमध्ये पावसाने काहीशी ओल दिली असली, तरी धरणे अजूनही कोरडीच आहेत; गावोगावी टँकर अजूनही सुरूच आहेत. हे चित्र पालटण्यासाठी आणखी काही दिवस सातत्यपूर्ण पावसाची आवश्यकता आहे. मुंबई व कोकणात जोरदार पाऊस झाला, तर पुण्यात बुधवार सकाळपर्यंत रिमझिम सुरू होती. या महिन्याच्या सुरुवातीपासूनच शेतकरी पेरण्यांच्या तयारीत होते. ताज्या पावसाने जमिनीत काहीशी ओल धरली असली, तरी पेरण्यांसाठी ती पुरेशी नाही; त्यामुळेच दुबार पेरणीचे संकट टाळण्यासाठी आता किमान ६० मिमी. पाऊस होईपर्यंत पेरण्या करू नका, हा सरकारचा सल्ला पाळावा लागेल. पावसाने दडी मारल्याने फटका मूग-उडदासारख्या पिकांना फटका बसू शकतो. पावसाचे आगमन लांबल्याने धरणेही कोरडी पडलेली आहेत. राज्यातील प्रमुख धरणांमध्ये अजूनही फक्त २०-२५ टक्के साठा आहे; पुण्यासारख्या भागांत तर हे प्रमाण दहा टक्केच आहे. पहिला पाऊस जमिनीत मुरतो आणि जमिनीची तहान भागवल्यानंतर पाणी ओढ्या-नाल्यांमधून वाहू लागते. त्यानंतरच धरणांमध्ये पाणी साठू लागते. त्यासाठी आणखी काही दिवस पाऊस होणे गरजेचे आहे. त्यामुळेच प्रमुख शहरांमध्ये पाणीकपात आणि गावोगावी-दुर्गम भागांमध्ये टँकर सुरूच आहेत. त्यातही उच्च न्यायालयातील सुनावणीमध्ये यंत्रणांची असंवेदनशीलता उघड झाली. मेळघाटातील गावकऱ्यांच्या पाणी मिळत नसल्याच्या तक्रारींवर अधिकाऱ्यांनी खुशाल 'टँकर सुरू आहेत,' असे उत्तर दिले; मात्र पाणी मिळत नव्हते आणि दूषित पाण्याने माणसे आजारी पडू लागली; ही वस्तुस्थिती समोर आल्यानंतर न्यायालयाने या बाबूंची कानउघाडणी केली. आता तरी सोपवलेली कामे इमानेइतबारे होतील, अशी आशा आहे. अजूनही राजस्थान, पंजाब, दिल्ली, हरियाणा असा बहुतेक उत्तर भारत कोरडा आहे. आता पाऊस आला, तरी तो सरासरी गाठणार का आणि पिकांना गरज असेल, अशा पद्धतीने वेळोवेळी होणार का, असे प्रश्न कायम आहेत. ग्रामीण भागात पावसाचे आगमन आशा उंचावणारे असले, तरी या पहिल्याच पावसाने प्रमुख शहरांमधील पायाभूत सुविधांचा बोजवारा उडवून दिला. मुंबईत गेले काही दिवस वाजतगाजत नालेसफाईचे पाहणी दौरे पार पडले होते; मात्र पहिल्याच पावसात किंग्ज सर्कल, अंधेरी सबवे आणि मानखुर्द अशा विविध भागांमध्ये साचलेल्या पाण्याने नालेसफाईचे पितळ उघडे पाडले. यापूर्वी काही नागरिकांचे प्राण घेणाऱ्या उघड्या गटारांचा सापळाही कायम आहे. खुद्द महापौर रितू तावडे यांच्या दौऱ्यात त्यांच्या समोरच एक अधिकारी अशा गटारात पडल्याने महापालिका प्रशासनाचा कारभार समोर आला. मुंबई-गोवा मार्गाचे काम पूर्ण होण्याचे नवनवे मुहूर्त पुन्हा कागदावरच राहिल्याचे दिसून आले. ठिकठिकाणी पावसाने खचलेल्या या महामार्गाची दुर्दशा पुन्हा नागरिकांच्या त्रासात भर घालत आहे. अन्य शहरांमध्येही थोड्याबहुत फरकाने हेच चित्र दिसून आले. पुण्या-मुंबईत रस्त्यांवर पाण्याची तळी साचल्याने बहुतांश भागांमध्ये पावसाबरोबरच वाहतूक कोंडीचेही आगमन झाले आहे. अगदी गल्लीबोळांतही काँक्रिट रस्ते करण्याच्या अट्टहासामुळे जमिनीत पाणी मुरण्यास जागा शिल्लक नाही आणि ड्रेनेज यंत्रणा तुंबलेली असल्याने ही स्थिती उद्भवते, याची जाणीव 'विकासजीवीं'ना कधी होणार, हा प्रश्नच आहे. एकीकडे पुरेशा पावसाची प्रतीक्षा आणि दुसरीकडे नागरिकांची सुविधा अशा विविध पातळ्यांवर सज्ज राहण्याचा इशाराच पहिल्या पावसाने दिला, असे म्हणावे लागेल.

पेरणीयोग्य पावसाची प्रतीक्षा

प्रतीक्षेनंतर मराठवाड्यात मान्सूनने अखेर हजेरी लावली असली तरी पेरणीसाठी आवश्यक असलेल्या दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. काही जिल्ह्यांत झालेल्या जोरदार पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत, तर अनेक भागांतील शेतकरी अजूनही समाधानकारक पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

महिनाभरापासून दडी मारलेल्या मान्सूनने अखेर मराठवाड्यात हजेरी लावली आहे. त्यामुळे रखडलेल्या पेरण्यांना काहीसा वेग मिळण्याची शक्यता आहे. मंगळवार आणि बुधवारी मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली. यामध्ये सर्वाधिक पाऊस छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत नोंदवला गेला. मात्र बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यांमध्ये अद्यापही पेरणीयोग्य पाऊस झालेला नाही. त्यामुळे येथील शेतकरी अजूनही दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. महसूल विभागाच्या निकषानुसार, २४ तासांत ६५ मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस झाल्यास संबंधित मंडळात अतिवृष्टी झाल्याचे मानले जाते. दरम्यान, जालना जिल्ह्यात सर्वाधिक २१.० मिलिमीटर, तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १९.९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव परिसरात ढगफुटीसदृश पाऊस झाला, तर जरंडी गावाजवळील मातीचा पूल पावसामुळे वाहून गेल्याने या मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. तसेच पुराच्या पाण्यात एक दुचाकी वाहून गेली होती. मात्र ग्रामस्थांनी तत्परता दाखवत दुचाकीस्वाराचा जीव वाचवला. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात पावसानंतर ओढे आणि नाल्यांना पूर आला. आडगाव बाजार ते आडगाव फाटा या रस्त्यावरील वाहतूक काही काळ पूर्णपणे बंद झाली होती. त्यामुळे ग्रामस्थ आणि वाहनधारक पुराच्या पाण्यात अडकले होते. परभणी शहरात बुधवारी सकाळपासून हलक्या पावसाला सुरुवात झाली. जिल्ह्यातील पाथरी, मानवत, जिंतूर, येलदरी, सेलू, बोरी, आसेगाव आणि ताडकळस या भागांतही पावसाने चांगलीच हजेरी लावली. नांदेड जिल्ह्यातील हदगाव, अर्धापूर, मुखेड, कंधार आणि मुदखेड या भागांत मेघगर्जनेसह दमदार पाऊस झाला. हदगाव येथे तब्बल तीन तास मुसळधार पाऊस कोसळला. या पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहू लागले असून काही भागांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले होते. नांदेड जिल्ह्यात आतापर्यंत ८ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या होत्या. आता शेतीत पुरेसा ओलावा निर्माण झाल्याने उर्वरित पेरणीच्या कामाला वेग येण्याची शक्यता आहे. धाराशिव जिल्ह्यातील शेतकरीही पेरणीयोग्य पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. २४ जूनपर्यंत धाराशिव जिल्ह्यात सरासरीच्या १२.९ टक्के इतक्या पावसाची नोंद झाली आहे. हिंगोली जिल्ह्यात बुधवारी जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मृग नक्षत्र कोरडे गेल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या होत्या; मात्र आता पावसाने हजेरी लावल्याने हिंगोली जिल्ह्यातील शेतजमिनींमध्ये पाणी साचले आहे. मराठवाड्यात सर्वाधिक पाऊस जालना जिल्ह्यात झाल्याची नोंद आहे. जिल्ह्यातील चार महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. रामनगर महसूल मंडळात १०९ मिलिमीटर, धनगर पिंपरी येथे ९१ मिलिमीटर, तर जालना शहर आणि पाचनवडगाव येथे प्रत्येकी ८७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. अंबड शहरात ५३ मिलिमीटर पाऊस झाला. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून अनेक भागांतील शेतकऱ्यांनी पेरणीला सुरुवात केली आहे. बीड जिल्हा वगळता इतर जिल्ह्यांत कमी-अधिक प्रमाणात पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पेरणीची लगबग सुरू झाली आहे. दरम्यान, राज्यात मान्सून वेगाने पुढे सरकत आहे. बुधवारी उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील उर्वरित भागांत प्रगती करत मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापल्याची माहिती हवामान विभागाने दिली. पुढील तीन दिवस मराठवाडा आणि विदर्भात मध्यम ते जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सध्या मराठवाड्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले असून काही ठिकाणी अधूनमधून भुरभुर पाऊस पडत आहे. त्यामुळे लवकरच दमदार पावसाला सुरुवात होईल, अशी आशा शेतकऱ्यांना लागली आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये खरीप हंगामासाठी पोषक वातावरण तयार झाले असून शेतकऱ्यांमध्ये पेरणीबाबत उत्सुकता वाढली आहे. मात्र, हवामान विभागाने किमान १०० मिलिमीटर पाऊस झाल्यानंतरच पेरणी करण्याचे आवाहन केल्याने अनेक भागांतील शेतकऱ्यांनी सध्या पेरणी थांबवली आहे. काही ठिकाणी पावसाची समाधानकारक स्थिती असली तरी अनेक भागांमध्ये अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे. त्यामुळे शेतकरीही संभ्रमात असल्याचे चित्र आहे. २४ जूनच्या पावसानंतर मराठवाड्यातील शेतकरी खरीप पेरणीच्या तयारीला लागले असून बियाणे व खत खरेदीसाठी कृषी सेवा केंद्रांवर गर्दी वाढली आहे. शेतकऱ्यांनी कृषी पंपांसाठी दिवसा किमान आठ तास वीजपुरवठ्याची मागणी केली आहे. दिवसा वीज मिळाल्यास शेतीचे नियोजन सुधारेल आणि मराठवाड्यातील शेतीला मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

माणसाची पचनक्रिया चांगली असेल तर त्याचे आरोग्य चांगले राहते. व्याधी उद्भवू नयेत किंवा रोगांचा शरीरात शिरकाव होऊ नये, यासाठी पचनक्रिया व्यवस्थित असणे फार महत्त्वाचे असते. पचन बिघडले की अनेक आजार सुरू होतात. पचन बिघडण्यामागे अनेक कारणे असतात.

अपचन : घरच्या घरी मिळवा असा आराम

वेळीअवेळी अरबट चरबट खाणे, अति तेलकट, जड पदार्थांचे वारंवार सेवन, अपुरी झोप, पोट साफ न होणे, दीर्घकाळ काहीही न खाणे यामुळे अपचन होते आणि त्याचा परिणाम म्हणजे पोटात जळजळ, करपट ढेकर, पोटदुखी, पोट फुगणे, उलटी, जुलाब अशी लक्षणे दिसू लागतात. थंडीच्या तुलनेत उन्हाळ्यात अपचन होण्याचे प्रमाण अधिक असते.

अपचन अति खाण्यापिण्यामुळे झाले असेल तर त्यावर काही घरगुती उपचार जरूर करावेत. त्याने बराच आराम मिळतो. अपचनाचा त्रास होऊ लागला की घरात वेलदोडा असतो, त्याची कुटून पूड करावी आणि अर्धा चमचा पूड खडीसाखरेबरोबर घ्यावी. वेलदोडा पाचक आहे. तसेच तीन चिमूट जायफळ पूड आणि दोन चमचे लिंबू रस दररोज घेतल्यास ज्यांना
नेहमी अपचन होते, त्यांची समस्या दूर होते.

धणेपूड आणि सुंठ यांचे मिश्रण पचनासाठी फार मदतगार ठरते. दोन चमचे धणेपूड, अर्धा चमचा सुंठ दोन ग्लास पाण्यात घालून उकळून थंड करावे. हे पाणी २-२ चमचे तीन वेळा घ्यावे. सुंठ आणि बडीशेप पचन सुधारण्यास मदत करणारे आहेत. पाव चमचा सुंठ, १चमचा बडीशेप आणि थोडी खडीसाखर सकाळ, दुपार, संध्याकाळ चावून खावी.

पोट फार दुखत असेल तर ओवा तव्यावर भाजून चावून खावा. त्यावर थोडे कोमट पाणी प्यावे. आल्याचा रस आणि सैंधव व थोडे हिंग यांचे चाटण करून ते घ्यावे. आल्याचे नुसते तुकडे चावून खावेत. हिंग पोट विकारांवर अतिशय उत्तम गुणकारी असून त्यामुळे गॅस कमी होण्यास मदत मिळते. हिंग कोमट पाण्यात घालून प्यावे किंवा पूड पोटावर चोळावी. सकाळी पिकलेले केळे खाल्ल्यानेही पचन सुधारते.



घनदाट, मुलायम केसांसाठी लावा केळ्यांपासून तयार केलेला हेअर पॅक



स्त्रियांचे खरं सौंदर्य त्यांच्या केसात दडलेलं असतं, असं म्हणतात. अनेक जणींना लांब, काळेभोर केस आवडतात. मात्र सध्याच्या धकाधकीच्या जीवनात अशा लांबसडक केसांची काळजी घेणं शक्य होत नाही. केसांची काळजी ही लहानपणी आई घेते आणि नंतर मोठेपणी अनेक कारणांनी त्याकडे दुर्लक्ष होते आणि मग अचानक कधीतरी जाणवते... केस गळत आहेत, पिकताहेत, रुक्ष झालेत इत्यादी. मग त्यानंतर घनदाट, मुलायम आणि निरोगी केसांसाठी घरगुती उपाय करण्याकडे अनेकांचा कल असतो. आज आपण घनदाट केसांसाठी केळ्यांचा उपाय कसा करतात याची माहिती जाणून घेणार आहोत.

केळी हे बिनबियांचे फळ आहे. निसर्गतःच जंतुनाशक वेष्टनामध्ये असल्याने केळ्यातून जंतूंची बाधा होत नाही, त्यामुळे आपोआपच सर्वांचे आरोग्य उत्तम राहते. वर्षभर उपलब्ध असणारे, सर्वांच्या खिशाला परवडणारे हे फळ आबालवृद्धांना आवडते. केळ्याला शास्त्रीय भाषेमध्ये 'मुसा पॅराडिसिॲका' म्हटले जाते. केळ्यापासून तयार केलेला हेअर पॅक तुम्हाला घनदाट आणि निरोगी केस तसेच केसांची गळती, कोंडा थांबवतो. जाणून घेऊयात केळ्यांपासून हेअर पॅक कसा तयार करतात.

सामग्री

● केळी ● एक चमचा मध ● एक चमचा केसाला लावायचे तेल ● एक चमचा दही.

असा तयार करा हेअर पॅक

● केळ्यांची मिक्सरमध्ये पेस्ट तयार करून घ्या.

● या पेस्टमध्ये मध, तेल आणि दही टाकून पुन्हा मिक्सरमध्ये एकत्र करा.

● त्यानंतर या पेस्टला केसांवर लावा अन् चांगली मालीश करा.

● एक ते दोन तास ही पेस्ट केसावरच राहू द्या.

● तुमच्या नियमित शाम्पूने केसांना चांगले धुऊन घ्या आणि कंडीशनर लावा.

कंडीशनर लावल्यानंतर कंगव्याने केसांना हळूहळू विंचरा; जेणेकरून केसांमधील केळ्याचा तुकडा किंवा हेअर पॅक राहणार नाही. त्यानंतर थोडा वेळ थांबा आणि पुन्हा कंगव्याने केस विंचरा.

मासिक पाळी अनियमित होण्यामागील कारणे, दुर्लक्ष करू नका

स्त्रियांमध्ये मासिक पाळीचा कालावधी नियमित असणे चांगलेच असते. हे चांगल्या आरोग्याचे सूचक असते. जर ती उशिरा किंवा अनियमित येत असेल तर यामागची अनेक कारणे असू शकतात. जास्त वजन वाढणेदेखील पाळी उशिरा येण्याचे कारण असू शकते. याव्यतिरिक्त इतर कारणं कोणती असू शकतात, जाणून घेऊया...

● जास्त वजन किंवा लठ्ठपणादेखील मासिक पाळीच्या अनियमिततेचे प्रमुख कारण असू शकते. कधी कधी ही समस्या थायरॉईडच्या आजारामुळेसुद्धा उद्भवते. त्यासाठी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक असते.

● कमी किंवा जास्त वयामध्ये मासिक पाळी सुरू होणेदेखील अनियमितता असू शकते. ही एक सामान्य गोष्ट असू शकते. कालांतराने हे नियमित होऊ शकते, काळजी करायचे काहीच कारण नाही.

● पॉलिसिस्टिक अंडाशय सिंड्रोम मासिक पाळी उशिरा येण्याचे एक गंभीर कारण असू शकतं, म्हणून जर का वरील दिलेल्या कारणांव्यतिरिक्त अन्य काही घडत असल्यास त्याची चौकशी केली पाहिजे.

● जास्त ताण आणि जास्त व्यायाम करणेसुद्धा मासिक पाळीच्या अनियमिततेचे कारण असू शकतं. अंडाशयावर आवरण (सिस्ट) बनल्यामुळेसुद्धा मासिक पाळीची अनियमितता असू शकते.

पारिजातकाच्या फुलांचे आश्चर्यकारक फायदे

◆ **ताण कमी करते :** पारिजातकाच्या फुलांमध्ये ताण दूर करण्याची शक्ती असते. जीवनात हे फूल आनंद पसरवते. त्याच्या सुगंधामुळे मेंदूला शांतता मिळते.

◆ **थकवा निवळतो :** पारिजातकाची फुले रात्रीच्या वेळी उमलतात आणि सकाळी कोमेजतात. अशी आख्यायिका आहे की पारिजातकाला स्पर्श मात्र केल्यानेच अंगातला सर्व थकवा दूर होतो.

◆ **चिरतारुण्य :** पौराणिक कथेनुसार पारिजातकाच्या झाडाला स्वर्गातून पृथ्वीवर आणल्याचे मानले जाते. नरकासुराच्या वध केल्यावर श्रीकृष्ण स्वर्गात गेले असताना इंद्राने त्यांना पारिजातकाचे फूल दिले. कृष्णाने ते फूल देवी रुक्मिणीला दिले. देवी सत्यभामेला देवलोकाची देवमाता आदितीने नेहमी चिरतारुण्य राहण्याचा वर दिला. तेवढ्यात नारद तिथे आले आणि त्यांनीही सत्यभामेला पारिजातकाची महती सांगितली. त्या प्रभावामुळे देवी रुक्मिणी पण चिरतारुण्यवती झाली. सत्यभामेला हे कळल्यावर ती क्रोधीत झाली. तीने श्रीकृष्णाकडून पारिजातक वृक्ष घेण्याचा आग्रह धरला. अशी आख्यायिका आहे की, पारिजातकाच्या वृक्षाचा उगम समुद्रमंथनाच्या वेळेस झाला होता; ज्याला इंद्राने आपल्या बागेत लावला होता.



◆ **हृदयविकारावर फायदेशीर :** पारिजातक हृदयविकारामध्ये फायदेशीर असते. १५ ते २० फुलांचा रस घेणे हृदयासाठी फायदेशीर असते. हृदयरोग रोखण्यासाठी हा एक प्रभावी मार्ग आहे. हा उपाय डॉक्टरांच्या सल्ल्याने करायला हवा.

अनुलोम, विलोम म्हणजे काय? हे घरी कसे करावे?



प्राणायामाची सुरुवातीची क्रिया आहे अनुलोम आणि विलोम. यामुळे मेंदूमध्ये ऑक्सिजनची पातळी वाढते. यामुळे फुफ्फुसं बळकट होतात. कोरोनाच्या संसर्गाच्या काळात आपले फुफ्फुस बळकट असणे गरजेचे आहे. जाणून घेऊ या अनुलोम, विलोम प्राणायाम कसा करावा...

प्राणायामात ३ क्रिया करतात

१. पूरक,
२. कुंभक,
३. रेचक

यालाच हठयोगी अभ्यानंतर वृत्ती, स्तंभ वृत्ती आणि बाह्य वृत्ती असेही म्हणतात. हेच अनुलोम आणि विलोम आहे. नाडीशोधन प्राणायामाची ही सुरुवातीची क्रिया असते.

१. पूरक : नियंत्रित वेगाने श्वासाला आत घेण्याची क्रिया पूरक असते. श्वास आत घेताना किंवा बाहेर सोडताना दोन्ही वेळेस त्यामध्ये लय आणि अनुपात असणे गरजेचे असते.

२. कुंभक : आत घेतलेल्या श्वासाला क्षमतेनुसार रोखून धरण्याच्या प्रक्रियेला कुंभक म्हणतात. श्वास आत रोखण्याची क्रिया आंतरिक कुंभक आणि श्वासाला बाहेर सोडून काही वेळ थांबण्याच्या क्रियेला बाह्य कुंभक म्हणतात. यामध्ये लय आणि अनुपात असणे गरजेचे आहे.

३. रेचक : आत घेतलेला श्वास हळुवारपणे सोडण्याच्या क्रियेला रेचक म्हणतात. यामध्ये श्वास घेताना आणि सोडताना दोन्ही वेळेस लय आणि अनुपात असायला हवा.

फायदे : सर्व प्रकारचे ताणतणाव कमी करून शांती देणाऱ्या या प्राणायामामुळे शरीराच्या सर्व नाड्यांना लाभ मिळतो. डोळे सतेज होतात, रक्तपुरवठा सुरळीत होतो. निद्रानाशाचा त्रास असल्यास त्यासाठी पण हे फायदेशीर आहे. त्याचबरोबर मेंदूचे सर्व विकार दूर करण्यासाठी सक्षम आहे. या प्राणायामामुळे फुफ्फुसात साचलेली घाण बाहेर निघते आणि फुफ्फुसं बळकट बनतात. किमान १० मिनिटे अनुलोम, विलोम प्राणायाम केल्याने डोकेदुखीच्या आजारापासून मुक्ती मिळते. नकारात्मक विचारांपासून मन दूर होऊन आनंद आणि उत्साहात वाढ होते.

इंटरनेटविना होईल ऑनलाइन पेमेंट! जाणून घ्या कशाप्रकारे वापरता येईल गुगल वॉलेट

भारतात सध्या ५जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी सादर करण्यात आली आहे, परंतु तरीही काही ठिकाणी आजही इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध नाही. त्यामुळे गुगलची एक नवीन टेक्नॉलॉजी खूप उपयुक्त ठरू शकते. ज्यात इंटरनेटविना ऑनलाइन पेमेंट करता येईल. गुगलनं कॉण्टॅक्टलेस पेमेंट सिस्टम सादर केली आहे. यात गगुल वॉलेट व्हर्च्युअल कार्ड पेमेंटशी जोडले जाईल. या टेक्नॉलॉजीमध्ये गुगलला एकदा इंटरनेट कनेक्शन असताना कार्ड कनेक्ट करावा लागेल. त्यानंतर इंटरनेटविना पेमेंट करता येईल. कार्ड कनेक्ट झाल्यावर तुम्ही सिम्पल टॅप करून पेमेंट करू शकता.

भारतात ५जी इंटरनेट कनेक्टिव्हिटी काही ठिकाणी कमी आहे. त्यापासून वाचण्यासाठी गुगलने वॉलेटमध्ये व्हर्च्युअल कार्ड जोडून एक नवीन पेमेंट सिस्टम सुरू केली आहे. या पेमेंट सिस्टममध्ये गुगल वॉलेटवरून इंटरनेटविना देखील पेमेंट करता येईल.

कशी वापरायची नवीन पेमेंट सिस्टम

कॉण्टॅक्टलेस पेमेंटमध्ये कार्ड आणि कार्डविना फोन किंवा स्मार्टवॉचने पेमेंट करता येईल. जेव्हा तुम्ही गुगल वॉलेट ओपन करता तेव्हा एक डिफॉल्ट व्हर्च्युअल कार्ड दिसते. त्या पॉइंटवर फोन कार्ड डेटा रीडरपर्यंत पोहोचतो. जेव्हा तुमचा अँड्रॉइड फोन एनएफसी सिग्नल रीडरकडे पोहोचतो तेव्हा पेमेंट होतं.

तसेच जेव्हा तुम्ही ऑफलाइन असता तेव्हा तुमचा फोन कोणत्याही समस्येविना गुगल वॉलेटच्या एनएफसी-संचारित कोडचा वापर करून पेमेंट करतो. परंतु जर तुम्ही बराच काळ ऑफलाइन राहिलात तर पेमेंट नीट होत नाहीत.

नोट : ऑफलाइन पेमेंटसाठी गुगलला दर दोन दिवसांनी कमीत कमी एकदा इंटरनेटशी कनेक्ट व्हावं लागेल. ज्यामुळे तुम्ही बिनदिक्कत गुगल वॉलेटवरून ऑफलाइन पेमेंट करू शकाल.



यूपीआय लाइटदेखील येईल वापरता

रिझर्व्ह बँकेने गेल्या आठवड्यात यूपीआय लाइट लाँच केले. यूपीआय लाईट हे नियमित यूपीआयपेक्षा थोडे वेगळे आहे. हे एक 'ऑन-डिव्हाइस वॉलेट' वैशिष्ट्य आहे, जे वापरकर्त्यांना यूपीआय पिन न वापरता रिअल टाइममध्ये लहान रक्कम पेमेंट करण्याचा पर्याय उपलब्ध करून देते. यूपीआय लाइट लहान रकमेच्या व्यवहारांसाठी तयार केले आहे. त्यामुळे याद्वारे व्यवहाराची सर्वाधिक मर्यादा ५०० रुपये आहे. एनपीसीआय वेबसाइटनुसार यूपीआय लाइटद्वारे ५०० रुपयांपेक्षा कमी पेमेंटसाठी वापरकर्त्यांना यूपीआय पिनची गरज पडणार नाही. याशिवाय एनपीसीआयने म्हटले की, सुरुवातीला यूपीआय लाइट ऑफलाइन काम करेल.

वाढत्या प्रदूषणामुळे आरोग्यावर परिणाम जाणून घ्या प्रतिबंधात्मक उपाय

वाढते प्रदूषण हा जगभरातील मोठा धोका आहे. प्रदूषणामुळे लोक अनेक गंभीर आजारांना बळी पडत आहेत. वाढत्या वायू प्रदूषणामुळे फुफ्फुसाचे आजार, दमा, धाप लागणे, डोळे जळणे, घशातील संसर्ग, क्षयरोग असे गंभीर आजार होत आहेत. वाढत्या प्रदूषणाचा धोका लक्षात घेऊन जागतिक स्तरावर अनेक संस्था त्यावर उपाययोजना करत आहेत. पण एवढेच नाही तर प्रदूषणामुळे तुम्हाला शरीराशी संबंधित गंभीर आजार तर होतातच पण त्यामुळे तुमच्या मानसिक आरोग्यावरही वाईट परिणाम होत आहेत. ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार, जगभरातील प्रदूषणामुळे १८ ते २५ वयोगटातील तरुणांना अनेक मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. हवामान बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि अनेक गंभीर आजारांशिवाय प्रदूषणाचा लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. वाढत्या प्रदूषणामुळे तरुणांना पर्यावरण चिंतेची समस्या भेडसावत आहे. प्रतिध्वनी चिंताची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल तपशीलवार जाणून घेऊया.

इको चिंता म्हणजे काय?

वाढत्या प्रदूषणामुळे शरीराला गंभीर आजार तर होत आहेतच, पण त्याचबरोबर ते मानसिक समस्यांनाही कारणीभूत ठरत आहे. वातावरणातील बदल, ग्लोबल वार्मिंग आणि वायू प्रदूषणाची वाढती पातळी यामुळे लोकांच्या मानसिक आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. अमेरिकन सायकियाट्रिक असोसिएशन (एपीए) च्या मते, पर्यावरण-चिंता ही अशी स्थिती आहे जी वाढत्या प्रदूषणामुळे आणि हवामानातील बदलांमुळे लोकांमध्ये चिंतेचे कारण बनते. त्यामुळे लोकांमध्ये अनिश्चित भीतीचे वातावरण निर्माण होऊन मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. चिंतेमुळे लोकांच्या कामावरही परिणाम होत असून त्यामुळे शारीरिक आरोग्यावरही परिणाम होत आहे. काही काळापूर्वी मानसशास्त्रज्ञांनी इको ॲन्झायटी दिली आहे आणि जगभर त्याविषयी बरीच चर्चा होत आहे. इको चिंतामुळे तुम्हाला आघात, तणाव, चिंता, नैराश्य आणि भीतीची भावना मुख्यतः १८ ते २५ वर्षे वयोगटातील लोकांमध्ये येत आहे.

इको एंग्जायटीची कारणे

पर्यावरणाच्या समस्या, वाढत्या प्रदूषणामुळे शरीरावर आणि आरोग्यावर होणारे परिणाम या चिंतेमुळे लोक पर्यावरणाच्या चिंतेचे बळी ठरत आहेत. यापैकी सर्वात जास्त प्रभावित लोक १८ ते २५ वयोगटातील तरुण आहेत. याशिवाय, ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, पर्यावरणातील बदल, ग्लोबल वॉर्मिंग आणि पर्यावरणीय संकटे, भविष्यात नोकऱ्या आणि इतर संकटांमुळे लोकांमध्ये पर्यावरणाची चिंता वेगाने पसरते यामुळे लोकांच्या काळजीचे एक कारण म्हणजे ते थांबवण्यासाठी काही करत नाहीत असा लोकांचा समज आहे.

पर्यावरण चिंता लक्षणे

वाढत्या प्रदूषणामुळे आणि पर्यावरणाशी संबंधित बदलांमुळे मानवावर अनेक परिणाम होत आहेत. याचा एक मोठा परिणाम म्हणजे यामुळे लोकांमध्ये पर्यावरणाच्या चिंतेची समस्या निर्माण होत आहे. इको चिंतेमुळे लोकांमध्ये दिसणारी लक्षणे खालीलप्रमाणे आहेत.

जास्त काळजी

■ भीती आणि अनिश्चित भीतीची भावना ■ कनिष्ठतेची भावना ■ झोप समस्या ■ भूक मध्ये बदल ■ लक्ष केंद्रित करू शकत नाही

इको एंग्जायटीपासून वाचण्याचे उपाय

इको चिंता टाळण्यासाठी, आपण प्रथम आपला आहार आणि आरोग्याकडे लक्ष दिले पाहिजे. याशिवाय, जर तुम्ही तुमच्या दिनचर्येतून थोडा वेळ काढू शकत असाल, तर तुम्ही पर्यावरणाशी संबंधित काही कामात स्वतःला झोकून दिले पाहिजे. याशिवाय तणाव किंवा चिंता यासारख्या मानसिक समस्या टाळण्यासाठी या गोष्टी लक्षात ठेवा.

■ मद्यपान आणि धूम्रपानापासून दूर राहावे.
■ कॉफी आणि कॅफिनयुक्त पदार्थांचे सेवन कमी करा.
■ उद्या किंवा भविष्याबद्दल जास्त काळजी करू नका.
■ नकारात्मक परिस्थिती आणि नकारात्मक विचारांपासून दूर राहा. ■ सकस आणि संतुलित आहार घ्या.
■ नियमित व्यायाम करा.



महत्त्वाचा कानमंत्र

● बोरे, अंजीर, पेरू यामध्ये अळ्या असण्याची शक्यता असते. म्हणूनच ही फळे धुवून, कापून खावीत.

● तेलकट कपडे धुताना पाण्यात साबणाबरोबर २-४ चमचे साखर टाकावी आणि त्यात कपडे भिजवावेत. यामुळे तेलकटपणा लगेचच जातो.

● फ्रीज साफ करताना कोमट पाण्यात थोडा सोडा घालून मऊसर कपड्याने पुसून घ्यावा. यामुळे फ्रीज स्वच्छ होतो.

● सिल्कचे ब्लाऊज सौम्य शाम्पूने धुवावे. म्हणजे रंग जात नाही आणि खराबही होत नाही.

● केराच्या बादलीत थोडेसे फिनेल शिंपडून ठेवल्यास घाण वास येत नाही आणि त्याभोवती चिलटे घोंगावत नाहीत.



स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी मेकअपच्या 'या' टिप्स येतील कामी, जाणून घ्या अधिक

बहुतांश वेळेस महिलांना प्रेग्नन्सीनंतर शरीरावर स्ट्रेच मार्क येतात. त्यामुळे एखादा शॉर्ट कुर्ता किंवा टी-शर्ट घातल्यास शरीरावरील स्ट्रेच मार्क दिसून येतात. असे झाल्यास आपल्याला स्ट्रेच मार्कमुळे अवघडल्यासारखे वाटते.

यामुळे आपण काही वेळेस स्टायलिश कपडे घालण्याचा विचार करत नाही. स्ट्रेच मार्क हे त्वचेवर ताण पडल्यास निर्माण होतात. यामध्ये घाबरण्याची किंवा लाजण्याची काहीच गरज नाही. पार्टीसाठी तयार होण्यासाठी काही जण हेच स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी विविध उपाय करतात. तर जाणून घ्या स्ट्रेच मार्क लपवण्यासाठी तुम्हाला मेकअपमधील काही सोप्या टिप्स कामी येतील.



स्ट्रेच मार्क लपवण्याची वेळ आल्यास रंगांची विसंगती काही वेळेस होते. त्यामुळे जर तुमची त्वचा तांबड्या रंगाची असेल तर त्याला हलक्या रंगाच्या मेकअपमधील पिवळ्या रंगाची शेड लावून लपवू शकता. तसेच अंगावरील स्ट्रेच मार्क खूप जुने असल्यास त्याबाबतसुद्धा काळजी करण्याचे काहीच कारण नाही. अशावेळी तुम्ही तुमच्या स्कीन टोनप्रमाणे रंग निवडून स्ट्रेच मार्क लपवू शकता.स्ट्रेच मार्क लपवल्यानंतर त्यावरील मेकअप कायम राहावा यासाठी मेअकप ब्रशने त्यावर सेटिंग पावडर लावणे विसरू नका. तसेच मेकअप शिवाय तुम्ही सेल्फ-टॅनरच्या मदतीने सहजतेने लपवू शकता. असे केल्यास तुम्हाला स्ट्रेच मार्क दिसत असल्याचीही जाणीव होणार नाही आणि तुम्ही मोकळेपणाने पार्टी एन्जॉय करू शकता.

केस गळती रोखेल कडीपत्ता आणि जास्वंद तेल

केसगळती ही जागतिक समस्या आहे. बरेच उपाय करूनही केसगळती काही कमी होत नाही. पण आपण कडीपत्ता आणि जास्वंदाच्या तेलाच्या वापर केल्यास केस गळतीपासून काहीसा आराम मिळू शकतो. यासाठी आपल्याला याचे तेल बनवावे लागणार आहे. चला तर मग हे तेल कसे बनवायचे आणि त्याचा वापर कसा करायचा हे जाणून घेऊ या.



साहित्य-

१०० ग्रॅम नारळाचे तेल, ३-४ चमचे एरंडेल तेल, ४ -५ जास्वंदाचे फुले, ३ मूठ कडीपत्ता, ३ चमचे तीळ, ३ चमचे मेथीदाणा, १ वाटी किसलेला कांदा, किसलेला आवळा आणि आले.

कृती : सर्वप्रथम नारळाच्या तेलात कडीपत्ता, जास्वंदाची फुले, तीळ, मेथीचे दाणे, किसलेला कांदा, किसलेला आवळा, आले घालून गॅसवर मंद आचेवर ठेवावे. गॅस मंदच असावा.

नाहीतर तेल जळू शकते. सर्व रसांचा अर्क नारळाचा तेलात उतरल्यावर गॅस बंद करून थंड होण्यासाठी ठेवावे. हे आयुर्वेदिक तेल आठवड्यातून दोनदा लावल्याने केसगळतीच्या त्रासापासून आराम मिळतो आणि केसगळती थांबते. गरज असल्यास एरंडेल तेलसुद्धा टाकावे. अजून चांगले परिणाम मिळतात.



डॅशिंग मुंढेंचा कारवाईचा धडाका

महिन्याभरात तब्बल 34 कोटींचा गुटखा जप्त

अन्न आणि औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडून कारवाईचा धडाका सुरु आहे. तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वात अन्न आणि औषध प्रशासनाने महिन्याभरात तब्बल 34 कोटींचा गुटखा आणि इतर प्रतिबंधित वस्तूंवर कारवाई केली आहे.

या अन्न पदार्थांवर करण्यात आली कारवाई

सदर अन्नपदार्थाच्या प्रकरणी ४३१ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून आंबे, दुध व दुग्धजन्य पदार्थ, Ready to serve fruit beverages, रंगमिश्रीत सुपारी, चहा पावडर, पॅकेज्ड पिण्याचे पाणी, खवा, बेकरी पदार्थ, कँडी, गुळ, खाद्यतेल, तूप, खजूर, आईसक्रिम/कुल्फी, फ्रोजन डेझर्ट, मसाल्याचे पदार्थ इत्यादी अन्न पदार्थ तसेच भेसळकारी पदार्थ म्हणून वापरण्यात येणारे अन्न पदाथार्चा सुमारे २९,११,८५,३३०/- रुपये किमतीचा २२.०४,१८२ किलो इतका साठा अन्न सुरक्षा व मानके कायद्याअंतर्गत जप्त करण्यात आला आहे. तसेच अन्न नमुने विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविले आहे.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याकडून गेल्या महिन्याभरापासून प्रतिबंधित अन्नपदार्थ पान मसाला, गुटखा विक्री, वितरण, वाहतूक या विरोधात कठोर कारवाई केली जात आहे. विशेष म्हणजे अन्न आणि औषध प्रसासनाने 25 मे 24 मे या महिन्याभराचा कालावधीत तब्बल 904 ठिकाणी धाडी टाकल्या आहेत. या धाडीत तब्बल 34 कोटी 66 लाख, 90 हजार 624 रुपयांचा गुटखा आणि इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईत आतापर्यंत एकूण 457 जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच 322 आस्थापना सील करण्यात आल्या आहेत. यासोबतच 42 वाहन जप्त करण्यात आले आहेत.

अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी 25 मे ते 24 जून दरम्यान मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर या विभागात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला विक्रेते आणि नियमभंग करणाऱ्या आस्थापनाविरुद्ध कारवाई केली. त्यामध्ये कोकण विभागात 155 आस्थापनाविरुद्ध कारवाई करून २८,७७,२०२ रु. किमतीचा माल, जप्त करण्यात आला. तसेच या कारवाईत १५६ व्यक्तींस अटक करण्यात आली आहे. मुंबई विभागात ९० आस्थापनाविरुद्ध कारवाई करून ३९,०२,५३५ रु. किमतीचा माल, जप्त करण्यात



आला आणि ८९ व्यक्तींस अटक करण्यात आली आहे.

नाशिक आणि नागपूर विभागात कारवाई

नाशिक विभागात ३१ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून १,४३,२६,६०६ रु. किमतीचा माल जप्त करण्यात आला. या कारवाईत २९ व्यक्तीस अटक करण्यात आली. नागपूर विभागात ३८ अस्थापनांची तपासणी करून ९६,८८,३८१ रुपये किमतीचा माल जप्त केला आहे. तसेच २९ व्यक्तींना अटक केली आहे.

पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि अमरावती विभागातही कारवाई

पुणे विभागात ८७ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून ८४,८९,८८९ रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला तर छत्रपती संभाजीनगर विभागात ३८ आस्थापनाविरुद्ध कारवाई करून ९६,८८,३८१ रुपये किमतीचा माल आणि १३ वाहन जप्त करण्यात आले. अमरावती विभागात करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये २५ अस्थापनेवर कारवाई करून १,१४,७१,५०२ रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आला आहे.

अन्न पदार्थांवरही कठोर कारवाई

राज्याच्या अन्न व औषध प्रशासन यांच्या "रांी ऋ्रूङ्ङ्ग, रांी ऊ१४, रांी ट्टं१ँ३१" ह्या संकल्पनेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनातर्फे महाराष्ट्र राज्यात कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन करून अनारोग्यदायी व अस्वच्छ वातावरणात अन्न पदार्थ उत्पादन करणाऱ्या आस्थापनांविरोधात धडक मोहिम राबविण्यात येत असून सदर मोहिमेअंतर्गत अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी राज्यातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर छापे टाकून संबंधित अन्न व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे. या मोहीमेत अन्न व औषध प्रशासनामार्फत मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, नागपूर व अमरावती या विभागात संशयित कमी दर्जा/असुरक्षित अन्नपदार्थ तसेच अस्वच्छ उत्पादन प्रक्रिया आणि लेबल दोष, मिथ्या छाप व भ्रामक जाहिरात केल्याकारणाने यावर कठोर कारवाई करण्यात आली आहे.

तुकाराम मुंढेंच्या नेतृत्वाखाली अन्न व औषध प्रशासनाने केलेल्या कारवाईबाबत आपले मत कमेंट बॉक्समध्ये शेअर करा, या कारवाईमुळे गुटखा विक्रीवर काय परिणाम होऊ शकतो?

केंद्राच्या तात्पुरत्या बंदीनंतर प्ले स्टोअरवर टेलिग्राम पुन्हा सुरू

पण ॲप स्टोअरवरून अजूनही गायब



नीट पुनर्परीक्षेपूर्वी केंद्र सरकारने टेलिग्राम वर तात्पुरती बंदी घातली होती. या बंदीनंतर जवळपास आठवडाभराने मंगळवारी (दि. २३) काही युजर्ससाठी टेलिग्रामची सेवा पुन्हा सुरू करण्यात आली.

■मुंबई। प्रतिनिधी,

नीट पुनर्परीक्षेतील संभाव्य पेपरफुटी रोखण्यासाठी केंद्र सरकारने तात्पुरती बंदी घातलेले मेसेजिंग ॲप टेलिग्राम आता काही युजर्ससाठी पुन्हा सुरू करण्यात आले आहे. मात्र, टेलिग्राम ॲपल ॲप स्टोअरवर उपलब्ध नसल्याने अनेकांना ते डाउनलोड करता येत नसून, काही युजर्सना अडचणी येत असल्याची माहिती समोर आली आहे.

आठवड्यानंतर टेलिग्राम पुन्हा सुरू

नीट पुनर्परीक्षेपूर्वी केंद्र सरकारने टेलिग्राम वर तात्पुरती बंदी घातली होती. या बंदीनंतर जवळपास आठवडाभराने मंगळवारी (दि. २३) काही युजर्ससाठी टेलिग्राम ची सेवा पुन्हा सुरू करण्यात आली. मात्र, सर्वच युजर्सना हे ॲप सुरू करता येत नसून अनेकांनी ते वापरताना अडचणी येत असल्याची तक्रार केली आहे.

गुगल प्ले स्टोअरवर उपलब्ध,ॲप स्टोअरवर नाही

गुगलने टेलिग्राम पुन्हा प्ले स्टोअरवर उपलब्ध करून दिले आहे. मात्र ॲपल ॲप स्टोअर वर हे ॲप अजूनही हटवलेलेच आहे. काही आयफोन युजर्स टेलिग्राम वापरू शकत असले तरी अनेकांना त्यांच्या जुन्या मेसेजपर्यंत पोहोचता येत नसल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.

केंद्र सरकारने बंदी का घातली?

केंद्र सरकारच्या मते, काही गैरप्रकार करणाऱ्या गटांकडून टेलिग्रामचा वापर केला जात होता. नीट पुनर्परीक्षेपूर्वी पेपरफुटी, दिशाभूल करणारी माहिती आणि फसवणुकीच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. सरकारने यापूर्वी ३ जून रोजी टेलिग्रामच्या प्रतिनिधींशी बैठक घेतली होती. त्यामध्ये परीक्षांशी संबंधित आक्षेपार्ह आणि दिशाभूल करणाऱ्या सामग्रीबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती. त्यानंतर टेलिग्राम ची वेब आवृत्ती आणि संबंधित वेब लिंकही देशभरात तात्पुरत्या बंद करण्यात आल्या होत्या.

'मेसेज एडिटिंग' फीचरवरही निर्बंध

केंद्र सरकारने टेलिग्राम ला त्यांचे 'मेसेज एडिटिंग' फीचर ३० जूनपर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. या फीचरचा वापर करून मेसेजमध्ये नंतर बदल करून चुकीची माहिती पसरवली जाऊ शकते, अशी सरकारची भूमिका आहे.

बिहारमध्ये गैरप्रकाराचा प्रयत्न केल्याप्रकरणी ३० जणांना अटक

२१ जून रोजी झालेली नीट-यूजी पुनर्परीक्षा कोणत्याही मोठ्या गैरप्रकाराशिवाय पार पडल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, बिहारमध्ये परीक्षेत गैरप्रकार करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पोलिसांनी ३० जणांना अटक केले आहे. यापैकी १८ जण परीक्षा केंद्रांवर काम करणारे कर्मचारी होते. त्यांच्यावर बायोमेट्रिक पडताळणीच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. उर्वरित आरोपींमध्ये इतर परीक्षार्थ्यांच्या जागी परीक्षा देण्याचा प्रयत्न करणाऱ्या तोतया परीक्षार्थ्यांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे.

टेलिग्राम चे सीईओ सरकारच्या निर्णयावर नाराज

टेलिग्रामचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पावेल दुरोव्ह यांनी या तात्पुरत्या बंदीवर टीका केली आहे. काही व्यक्तींनी प्रश्नपत्रिका शेअर केल्यामुळे संपूर्ण प्लॅटफॉर्मवर बंदी घालणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. दुरोव्ह यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, या निर्णयामुळे भारतातील १५ कोटींहून अधिक युजर्सना त्रास सहन करावा लागला. तसेच टेलिग्राम ने गेल्या काही आठवड्यांत परीक्षा साहित्य आणि फसवणुकीशी संबंधित शेकडो चॅनेल हटवली असल्याचाही दावा त्यांनी केला.

दिल्ली उच्च न्यायालयाचा सरकारच्या निर्णयाला पाठिंबा

टेलिग्राम ने या बंदीविरोधात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र न्यायालयाने ती फेटाळून लावत सरकारची कारवाई योग्य असल्याचे स्पष्ट केले. न्यायमूर्ती तेजस कारिया यांनी नीट सारख्या महत्त्वाच्या परीक्षेची पारदर्शकता राखण्यासाठी सरकारला आवश्यक ती पावले उचलण्याचा अधिकार असल्याचे नमूद केले. तसेच टेलिग्राम वरील सार्वजनिक प्रवेश रोखण्याचे अधिकार सरकारकडे असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

यंदाची आषाढी वारी जगभर पोहोचणार... डिस्कव्हरी आणि जिओग्राफी वाहिन्यांवरून थेट प्रक्षेपण

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेल्या यंदाच्या आषाढी वारीचा सोहळा डिस्कव्हरी आणि जिओग्राफी या आंतरराष्ट्रीय दूरचित्रवाहिन्यांद्वारे जगभर पोहोचणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दिली.

सरकारने वारीची सर्वंकष तयारी पूर्ण केली असून लाखो वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण प्रशासन युद्धपातळीवर काम करत आहे.



प्रकल्पाचे फायदे

- आषाढी वारीसाठी प्रशासन सज्ज
- पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती
- सर्व प्रमुख मुक्कामस्थळी जर्मन हँगरची उभारणी
- महिला वारकऱ्यांसाठी विशेष सुरक्षा व्यवस्था
- स्वच्छता, आरोग्य, पाणी आणि पोलीस यंत्रणांचा समन्वित आराखडा
- डीजेमुक्त, पारंपरिक आणि सुरक्षित वारीवर शासनाचा भर

वारीत कोणत्याही वारकऱ्यांची गैरसोय होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज विधानभवनात पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली. पालखी मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, राष्ट्रीय महामार्गावरील विकासकामे, मुक्कामस्थळी जर्मन हँगर, पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि सुरक्षा यंत्रणा यांची सक्षम व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व प्रमुख पालख्यांच्या मुक्कामस्थळी प्रशस्त हँगर उभारण्यात आल्याने लाखो वारकऱ्यांना पावसाळ्यात सुरक्षित निवारा मिळणार असल्याचे फडणवीस म्हणाले.

यावेळी पालखी सोहळा प्रमुखांच्या बहुतांश मागण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. विशेषतः महिला वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी मुक्कामस्थळी विशेष उपाययोजना करण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली.

डिजेमुक्त वारीसाठी प्रयत्न

दरम्यान, पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही समान सुविधा मिळाव्यात यासाठी सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांची नोडल पालकमंत्री आणि पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. डीजेमुक्त आणि पारंपरिक वारीसाठी पोलीस प्रशासनाने सर्व घटकांशी समन्वय साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

मिरा-भाईंदरमध्ये मनपा बस उभी असतानाच चाक तुटले



भाईंदर : मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. भाईंदर पश्चिम येथील पोलीस ठाण्यासमोर प्रवासी भरलेली बस उभी असतानाच अचानक तिचे पुढील चाक तुटल्याची धक्कादायक घटना गुरुवारी सायंकाळी घडली. बस थांबलेली असल्याने सुदैवाने एक मोठा अनर्थ टळला आणि सर्व प्रवासी सुखरूप बचावले. मात्र, हीच बस धावत्या वेळेस हा अपघात झाला असता, तर प्रवाशांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झाला असता, अशी भीती प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केली आहे.गुरुवारी सायंकाळी भाईंदर पश्चिम भागातून प्रवाशांनी तुडुंब भरलेली परिवहनची बस स्टेशनच्या दिशेने जाण्यासाठी निघाली होती. भाईंदर पश्चिम पोलीस ठाण्यासमोर प्रवाशांना उतरवण्यासाठी किंवा इतर कारणास्तव बस थांबली होती. त्याच क्षणी अचानक बसच्या पुढच्या बाजूचे चाक तुटले. चाक निघताच बस एका बाजूला कलली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे बसमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ आणि घबराट उडाली. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झाली नाही, परंतु प्रवाशांना भर रस्त्यात गाडीतून खाली उतरावे लागले. मुख्य रस्त्यावर आणि त्यातही पोलीस ठाण्यासमोर बसचे चाक तुटून ती मध्यभागी बंद पडल्यामुळे या मार्गावरील वाहतुकीचा मोठा खोळंबा झाला. सायंकाळच्या ऐन गर्दीच्या वेळी हा अपघात झाल्याने रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. मिरा- भाईंदर परिवहन सेवेच्या बस शहराच्या विविध भागात धावत असून, या बस चालवण्याची आणि त्यांच्या देखभालीची जबाबदारी एका खासगी ठेकेदारावर सोपवण्यात आली आहे. मात्र, संबंधित ठेकेदार आणि महानगरपालिकेचे परिवहन प्रशासन या बसच्या देखभाल-दुरुस्तीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शहरात दिवसेंदिवस मनपा बसने प्रवास करणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. असे असतानाही प्रवाशांच्या सुरक्षेशी खेळ केला जात आहे. यापूर्वीही परिवहन बसचे ब्रेक फेल होणे, तांत्रिक बिघाड होणे किंवा अपघात होण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. देखभाल दुरुस्तीअभावी अनेक बस खिळखिळ्या झाल्या आहेत. महापालिका प्रशासन आणि ठेकेदार एखाद्या मोठ्या अपघाताची वाट पाहत आहेत का? असा संतप्त सवाल आता प्रवाशांकडून उपस्थित केला जात असून, दोषी ठेकेदारावर कडक कारवाई करण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे.

नवे घर खरेदी केले अन् 6 महिन्यांच्या गर्भवती बायकोला...

सहा महिन्यांच्या गरोदर पत्नीची तिच्या पतीने निर्घृण हत्या केली आहे. किरकोळ कारणावरुन झालेल्या या वादाचे रुपांतर एका भीषण घटनेत झाले. फरिदाबादमधील या घटनेमुळे कौटुंबिक हिंसाचाराचे आणखी एक प्रकरण उघडकीस आले आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

कौटुंबिक वादातून एका सहा महिन्यांच्या गरोदर महिलेची तिच्या पतीनेच निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पतीने आधी महिलेला बेदम मारहाण केली आणि त्यानंतर पाण्याच्या बादलीत तिचे तोंड बुडवून तिला जीवे मारले. याप्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपीचा शोध सुरू आहे. नेहा असे 26 वर्षीय मृत महिलेचे नाव असून तिच्या आरोपी पतीचे नाव अमित असे आहे. हरियाणातील फरिदाबादमध्ये ही घटना घडली.

बादलीतील पाण्यात तोंड दाबून...

नेहा आणि अमित यांचा विवाह गेल्या वर्षी 30 एप्रिल रोजी झाला होता. त्यांनी नुकतेच फरिदाबादमधील कॉलनीतील एका नवीन घरात रहायला गेले होते आणि महिन्याभरापूर्वीच त्यांच्या नवीन घराचा गृहप्रवेश सोहळा पार पडला



होता. नातेवाईकांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (25 जून) सकाळी या दांपत्यामध्ये काही कारणावरून कडाक्याचे भांडण झाले. हा वाद इतका वाढला की, संतप्त अमितने आधी नेहाला मारहाण केली आणि नंतर अत्यंत क्रूरपणे बादलीतील पाण्यात तिचे तोंड दाबून तिचा जीव घेतला.

नातेवाईक घरी पोहोचले अन्...

या घटनेची माहिती मिळताच जेव्हा नातेवाईक त्यांच्या घरी पोहोचले, तेव्हा त्यांना नेहा मृत अवस्थेत आढळली. त्यांनी तातडीने पोलिसांना पाचारण केले. पोलीस ठाण्याचे पथक, गुन्हे शाखा (क्राइम ब्रँच) आणि फॉरेन्सिक युनिटने तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि तो शवविच्छेदनासाठी सिव्हिल हॉस्पिटलच्या शवागारात पाठवला. फॉरेन्सिक तज्ज्ञांनी घटनास्थळावरून महत्त्वाचे पुरावे गोळा केले असून, प्राथमिक तपासानुसार हे हत्येचेच प्रकरण असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

काकांना फोन करुन दिली हत्येची माहिती

तपासादरम्यान पोलिसांना समजले की, हत्येनंतर अमितने बदरपूर सीमेजवळील अलिपूर गावात राहणाऱ्या आपल्या काकांना फोन केला होता आणि आपण पत्नीची हत्या केल्याची कबुली दिली होती. या घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा मोबाईल फोनही बंद आहे. फरिदाबाद पोलिसांच्या प्रवक्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पतीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके संभाव्य ठिकाणांवर छापे टाकत आहेत आणि शवविच्छेदन अहवाल तसेच फॉरेन्सिक तपासणीनंतर पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल.


किरकोळ वादाचे हिंसक रूपांतर... पुण्यात गुंडाकडून हल्ल्याचा प्रयत्न

■पुणे। प्रतिनिधी,

पुण्यातील पाटील इस्टेट परिसरात एका किरकोळ वादातून मोठा गोंधळ उडाल्याची घटना समोर आली आहे. गाडी बाजूला घेण्याच्या कारणावरून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर थेट दहशतीत झाले. या प्रकरणी खडकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाटील इस्टेट येथील गल्ली क्रमांक 10 मध्ये ही घटना घडली. रस्त्यावर वाहन बाजूला घेण्यावरून दोन पक्षांमध्ये वाद झाला. या वादादरम्यान जुनी राजसिंग युवराज सिंग या सराईत गुन्हेगाराने आक्रमक भूमिका घेत हातात धारदार शस्त्र उचलले. त्याने समोरच्या व्यक्तीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे.

घटनास्थळी उपस्थित असलेल्या काही महिलांनी धाडस दाखवत आरोपीला रोखले. त्यांनी त्याच्या हातातील शस्त्र हिसकावून घेतल्याने मोठी दुर्घटना टळली. मात्र यानंतरही आरोपीने परिसरातील नागरिकांना



धमकावत गोंधळ घातला.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, आरोपीने "मी इथला भाई आहे, मी जे सांगेल तेच इथल्या लोकांनी ऐकायचे," असे म्हणत नागरिकांना धमकावले. त्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. रस्त्यावर सुरू असलेल्या या प्रकारामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली.

पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तक्रारीच्या आधारे आरोपीविरोधात खडकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीच्या हालचालींबाबत माहिती गोळा करण्यात येत असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

एचपीवी लसीकरणानंतर १६ वर्षीय मुलीचा संशयास्पद मृत्यू

पालकांनी केला आरोप

नाशिक : नाशिकमध्ये लसीकरणानंतर १६ वर्षीय श्रावणी पाटील या मुलीच्या संशयास्पद मृत्यूने खळबळ उडाली आहे. खुटवडनगर येथील लसीकरण शिबिरात एचपीव्ही प्रतिबंधक लस घेतल्यानंतर काही मिनिटांतच ती बेशुद्ध पडल्याचा दावा नातेवाईकांनी केला आहे. उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात नेत असताना तिचा मृत्यू झाला. या प्रकरणात लसीकरणामुळेच मृत्यू झाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला असून सखोल चौकशीची मागणी केली आहे. दुसरीकडे, मृत्यूचे नेमके कारण फॉरेन्सिक आणि वैद्यकीय अहवालानंतरच स्पष्ट होणार असल्याचे आरोग्य विभागाने म्हटले आहे. नाशिकच्या खुटवडनगर येथील लसीकरण शिबिरात १६ वर्षीय श्रावणी पाटील हिने एचपीवी लस घेतली होती. लस घेतल्यानंतर काही मिनिटांतच ती बेशुद्ध पडल्याचा दावा कुटुंबीयांनी केला. तिला तातडीने उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. मात्र रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच तिचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. लसीकरणामुळेच मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. प्रशासन सत्य लपवत असल्याचाही आरोप कुटुंबीयांकडून करण्यात आला आहे. या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. फॉरेन्सिक आणि वैद्यकीय तपासणी अहवालानंतरच मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे. चौकशीसाठी विशेष वैद्यकीय पथक नाशिकमध्ये येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.राज्यभर लसीकरण मोहीम राबवणाऱ्या विभागाचे वरिष्ठ अधिकारीही या प्रकरणाची चौकशी करणार आहेत. दहा लाख लोकांमध्ये एखाद्या व्यक्तीला लसीनंतर गंभीर रिएक्शन येऊ शकते, असा प्राथमिक अंदाज आरोग्य विभागाने व्यक्त केला आहे. चौकशी अहवाल आल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाणार असल्याचे आरोग्य विभागाचे उपसंचालक कपिल आहेर यांनी सांगितले.

नाशिकमधील या प्रसिद्ध सराफ व्यवसायाकडून बँकेच्या ३८ कोटी रुपयांचा अपहार, बाफणा ज्वेलर्सचे संचालक ताब्यात

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिक शहरातील सराफा व्यावसायिक क्षेत्राला हादरा देणाऱ्या तब्बल ३८ कोटी रुपयांच्या कथित बँक फसवणूक प्रकरणात बाफणा ज्वेलर्सचे संचालक नीलेश सुभाष बाफणा यांना अटक करण्यात आली आहे. सरकारवाडा पोलिस ठाण्यात दाखल गुन्ह्यात न्यायालयाने त्यांना २६ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

या बहुचर्चित प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू असून, बनावट स्टॉक स्टेटमेंटच्या आधारे टीजेएसबी सहकारी बँकेकडून कोट्यवधी रुपयांचे कर्ज उचलल्याचा आरोप आहे. बँकेचे व्यवस्थापक सुहास विजय दंडवते यांनी दिलेल्या फियार्दीनुसार, नीलेश बाफणा यांच्यासह सुभाष लखीचंद बाफणा, नम्रता नीलेश बाफणा, प्रभावती सुभाष बाफणा तसेच जामीनदार कांतिलाल लखीचंद बाफणा व सरला पारसमल बाफणा यांनी संगनमत करीत बँकेची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

नेमकं प्रकरण काय?

फियार्दीनुसार, बाफणा ज्वेलर्सने १९९८ मध्ये सुरुवातीला २० लाख रुपयांचे कॅश क्रेडिट कर्ज घेतले होते. त्यानंतर वेळोवेळी कर्जमयार्दा वाढवित ती तब्बल ४४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. कजार्साठी दुकानातील सोने, चांदी,



हिरे आणि व्यवसायातील येणी तारण ठेवण्यात आली होती. फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या ऑडिटमध्ये ५४.४८ कोटी रुपयांचा माल आणि २.०७ कोटी रुपयांची व्यापारी येणी असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र, मार्च २०२५ पासून कर्जावरील व्याज भरणे थांबल्यानंतर बँकेने वसुली प्रक्रिया सुरू केली.

मात्र, मार्च २०२५ पासून कर्जावरील व्याज भरणे थांबल्याने बँकेने वसुली प्रक्रिया सुरू केली. खाते एनपीए घोषित झाल्यानंतर सरफेसी कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आणि प्रत्यक्ष स्टॉक पडताळणीचा निर्णय घेण्यात आला.

३० एप्रिल रोजी सादर करण्यात आलेल्या स्टॉक स्टेटमेंटमध्ये दुकानात ५९ कोटी ७ लाख रुपयांहून अधिक किमतीचा माल असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, न्यायालय नियुक्त आयुक्त, पंच आणि मूल्यांकन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दुकानाची तपासणी करण्यात आली असता धक्कादायक वास्तव समोर आले. दुकानात सोने किंवा हिरे आढळून आले नाहीत. केवळ चांदीचे दागिने मिळाले असून त्यांची किंमत अवघी २५ लाख १९ हजार रुपये असल्याचे निष्पन्न झाले.

या तफावतीमुळे खोटे व बनावट स्टॉक स्टेटमेंट सादर करून बँकेकडून कोट्यवधी रुपयांचे कर्ज उचलल्याचा संशय अधिक गडद झाला आहे. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संतोष नरुटे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू असून आर्थिक व्यवहार, तारण मालमत्ता, ऑडिट अहवाल आणि स्टॉक स्टेटमेंटची सखोल छाननी केली जात आहे. या तपासातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com